**सुविचार**

बीती को बीती कर, बीती बातों से शिक्षा लेकर आगे के लिए सावधान रहिये।

(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/बुधवार दि. १० एप्रिल २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१४३ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# ठाकरे गटाला सर्वाधिक २१ जागा, काँग्रेस १७, पवार गट १० जागा लढवणार




मुंबई : प्रतिनिधी- महाविकास आघाडीतील जागावाटपाचा तिढा अखेर सुटला असून गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर आज आघाडीचे जागावाटप जाहीर करण्यात आले. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस फुटल्यामुळे आघाडीत काँग्रेस थोरला भाऊ असला तरी जागावाटपात मात्र सर्वाधिक २१ जागा मिळवण्यात शिवसेनेचा ठाकरे गट यशस्वी ठरला. काँग्रेस १७ तर राष्ट्रवादी काँग्रेस १० जागा लढवणार आहे. सांगली आणि भिवंडीसाठी काँग्रेस आग्रही होती; पण शेवटी आघाडी टिकवण्यासाठी काँग्रेसला त्यागाची भूमिका घ्यावी लागली व सांगली ठाकरे गटाकडे तर भिवंडी शरद पवार गटाला मिळाली. यामुळे काँग्रेस पक्षात मोठ्या प्रमाणात नाराजी निर्माण झाली आहे.

वंचित आघाडीला महाविकास आघाडीत सहभागी करून घेण्याचे प्रयत्न व काही जागांवरील दाव्यांमुळे महविकास आघाडीचे जागावाटप रखडले होते. पहिल्या दोन टप्प्यात उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर आज अखेर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) अध्यक्ष शरद पवार, शिवसेना ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, शेकाप नेते जयंत पाटील, डाव्या पक्षांच्या नेत्यांनी आज संयुक्त पत्रकार परिषद घेऊन आघाडीच्या (पान ७ वर)

# ईडीच्या पुराव्यांवरुन अटक वैध

नवी दिल्ली : दिल्लीतल्या मद्य धोरण घोटाळ्यात आरोप असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अडचणी संपत नसल्याचे चित्र आहे. ईडीने मनी लॉन्ड्रिंगच्या आरोपाखाली २१ मार्च रोजी अरविंद केजरीवाल यांना अटक केली. आज त्यांच्या अटकेचा २०वा दिवस आहे. त्यांच्या अटकेविरोधात दिल्ली हायकोर्टात आव्हान देण्यात आलं होतं. मात्र, ईडीचे पुरावे पाहून ही अटक वैध असल्याचा निकाल देत दिल्ली हायकोर्टाने केजरीवालांना मोठा धक्का दिला आहे. अटकेला आव्हान देणारी याचिका कोर्टाने फेटाळली आहे.

न्या. स्वर्ण कांता शर्मा यांनी निर्णय सुनावताना म्हटलं की, हे प्रकरण केंद्र सरकार आणि केजरीवाल यांच्यातील नाही तर ईडी आणि केजरीवाल यांच्यात आहे. मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी तपास यंत्रणांनी



त्यांना अटक केली. ईडीकडे असणारे पुरावे पाहता ही अटक वैध आहे. कुणालाही विशेषाधिकार देऊ शकत नाही. तपासातील चौकशीपासून मुख्यमंत्री म्हणून कुठलीही सवलत दिली जाऊ शकत नाही. न्यायाधीश कायद्याने बांधलेले आहेत, राजकारणाशी नाही असंही कोर्टाने स्पष्ट केले.

ईडीने आपल्या युक्तिवादात याचिकाकर्त्याचा या संपूर्ण प्रकरणात सहभाग असल्याचं म्हटलं आहे. या प्रकरणात राघव मुंगटा आणि शरत रेड्डी यांच्या जबानीप्रमाणे अनेक जबाब नोंदवण्यात आले आहेत. अरविंद केजरीवाल यांच्या वतीने त्यांच्या याचिकेत सरकारी साक्षीदारांच्या जबाबावर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. यावर टिप्पणी करताना हायकोर्टाने म्हटले की, अप्रूवरचं म्हणणं ईडीने लिहिलेले नसून कोर्टाने लिहिले आहे. जर तुम्ही त्यावर प्रश्न निर्माण करत असाल तर तुम्ही न्यायाधीशांना प्रश्न करत आहात. रेड्डी यांच्या वक्तव्यावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. केजरीवाल यांना साक्षीदारांची उलट तपासणी करण्याचा अधिकार आहे. पण कनिष्ठ न्यायालयात उच्च न्यायालयात नाही. कोणत्याही व्यक्तीच्या सोयीनुसार तपास करता येत नाही. तपासादरम्यान एजन्सी कोणाच्या तरी घरी जाऊ शकते असं न्यायालयाने स्पष्ट केले. (पान ७ वर)

### सोन्याच्या दरात वर्षभरात १३ हजारांची वाढ

मुंबई/जळगाव : दिवसेंदिवस सोन्याच्या दरात मोठी वाढ होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सोन्याच्या वाढत्या दरामुळे सर्वसामान्यांच्या खिशा-ला चांगलीच कात्री लागत आहे. दरम्यान, मागील वर्षीचा गुढीपाडवा ते याव-र्षीचा गुढीपाडवा या वर्षभरात सोन्याच्या दरात विक्रमी वाढ झाली. मिळालेल्या माहितीनुसार वर्षभरात सोन्याच्या दरात १३ हजार रुपयांची वाढ झाली आहे.

आज गुढीपाडव्याचा सण आहे. यानिमित्त मोठ्या प्रमाणात सोन्या चांदीच्या खरेदीत वाढ झाली. दर वाढूनही खरेदीत वाढ होतेय. गेल्या अनेक दिवसांपासून सोन्याच्या दरात वाढ होते. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना सोने खरेदी करणे कठीण झाले आहे. दरम्यान, गुंतवणुकीच्या दृष्टीने अनेक लोक सोन्यामध्ये गुंतवणूक करतात. ही गुंतवणूक मोठी फायद्याची ठरत आहे. दरम्यान, वायदे बाज-रात सोन्याच्या दराने विक्रमी पातळी गाठली आहे. सध्या सोन्याचा दर हा ७१७०० रुपयांवर गेला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत १३ हजार रुपयांची वाढ झाली आहे. मागील वर्षी याच काळात सोन्याचे दर हे ५८८०० रुपये होते. मात्र, वर्षभरात १० ग्रॅम सोन्यामागे १३ हजार रुपयांची वाढ झाली आहे.

सोन्याच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता

सोन्याने गेल्या वर्षभरात २२ टक्के परतावा दिला आहे. हा मागील १० वर्षातील सर्वोत्तम परतावा आहे. भू राजकीय (पान ७ वर)

# नरेंद्र मोदींसाठी मनसेचा महायुतीला बिनशर्त पाठिंबा

मुंबई : या देशाला चांगल्या खंबीर नेतृत्वाची गरज आहे. म्हणूनच केवळ मोदींसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी महायुतीला बिनशर्त पाठिंबा देत असल्याचे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जाहीर केले. मला राज्यसभा नको आणि विधानपरिषद नको, जागा वाटपाची वाटाघाटी नको, असेही ठाकरे यांनी जाहीर केले. मनसे लोकसभा निवडणूक लढविणार नसल्याचे राज ठाकरे यांच्या भाषणातून स्पष्ट होत आहे.

दादरमधील शिवाजी पार्क मैदानावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा आज (९ एप्रिल) रोजी गुढी पाडवा मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात राज ठाकरे काय बोलणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. कुणाशीही युती नाही, जे करायचं ते स्वबळावर, असा निर्धार करणाऱ्या राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वीच दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती. त्यामुळे ते लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर



मनसे शिवसेना-भाजपा-राष्ट्रवादीसोबत महायुतीत सहभागी होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मोदींना आणि महायुतीला पाठिंबा जाहीर केला.

राज ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती बिघडलेली असताना आपल्याला यातून पुढे जाण्यासाठी मार्ग काढायचा आहे. मनसे महाराष्ट्राला योग्य मार्ग दाखवेल. मात्र माझी महाराष्ट्रातील मतदारांना आणि जनतेला ही विनंती आहे की, कृपा करून व्यभिचाराला राजमान्यता देऊ नका. जे राजकारण सध्या राज्यात सुरू आहे. त्याला राजमान्यता मिळत गेली तर पुढचे दिवस भीषण येतील.

त्यामुळे पुढच्या पाच वर्षांचा विचार करता. मी देवेंद्र फडणवीस यांना म्हटलं की, मला कोणत्याही वाटाघाटी नको. मी त्यांना सांगितलं की, मला राज्यसभा ही नको विधानपरीषद ही नको. पण या देशाला चांगल्या आणि खंबीर नेतृत्वाची गरज आहे. त्यांच्याकडून माझ्या अपेक्षा आहेत. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा माझा पक्ष राज्यातील महायुती म्हणजेच भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी यांना फक्त नरेंद्र मोदी यांच्यासाठी बिनशर्त पाठिंबा देत आहे, असल्याचे राज ठाकरे यांनी घोषित केले.

लोकसभा निवडणुकीसाठी जास्त इच्छुक नाहीत. पण ते विधानसभा निवडणुकीत महायुतीत असणार असल्याचे संकेत राज यांनी दिले आहेत. कारण त्यांनी मनसैनिकांना विधानसभेच्या (पान ७ वर)

# लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात २०४ उमेदवार रिंगणात

मुंबई : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील ८ मतदारसंघांत नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. यात २९९ उमेदवारांचे अर्ज पात्र असून, त्यातील काही उमेदवारांनी माघार घेतल्याने २०४ उमेदवार निवडणूक लढवण्यास पात्र ठरले आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस. चोक्कलिंगम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंत्रालयातील पत्रकार कक्षात ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी चोक्कलिंगम बोलत होते. यावेळी सह सचिव व अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी, सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर, अवर सचिव तथा उप निवडणूक अधिकारी शरद दळवी उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात विदर्भातील रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली- चिमूर, चंद्रपूर या ५ लोकसभा मतदारसंघांमध्ये १९ एप्रिल, तर दुसऱ्या टप्प्यात बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड, परभणी या ८ मतदारसंघांमध्ये २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान घेण्यात येणार आहे.

दुसऱ्या टप्प्यातील या ८ लोकसभा मतदारसंघांतील निवडणुकीसाठी मतदारसंघनिहाय एकूण ८ जनरल निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर पोलीस निरीक्षक एकूण ५ आणि खर्च निरीक्षक एकूण ११ याप्रमाणे नियुक्त करण्यात आले आहेत. भारत निवडणूक आयोगाने ४० टक्के दिव्यांगत्व असलेले दिव्यांग व ८५ वयावरील ज्येष्ठ नागरिकांमधील इच्छुक मतदारांना १२ - डी अर्जान्वये गृह मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. त्यानुसार दुसऱ्या टप्प्यातील ८ लोकसभा (पान ७ वर)

# मुख्य निवडणूक आयुक्तांच्या जिवाला धोका?

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशाच्या इंटेलिजन्स ब्युरोने मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या जिवाला धोका असल्याचा रिपोर्ट दिला आहे. यामुळे खळबळ उडाली असून गृह मंत्रालयाने तातडीने हालच-ाली करत कुमार यांना झेड दर्जाची सुरक्षा व्यवस्था पुरविली आहे.



तृणमूलसह अन्य विरोधी पक्ष निवडणुकीत अशांतता पसरवत असल्याचे पाहून आयबीने थ्रेट पर-सेप्शन रिपोर्ट दिला होता. यावरून आयुक्तांना झेड सुरक्षा पुरविण्यात आली आहे. झेड दर्जाच्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये एकूण ३३ गार्ड तैनात असतात. यापैकी आर्म्ड फोर्सचे १० जवान हे त्या व्यक्तीच्या निवासस्थानी तैनात असतात. ६ राऊंड द क्लॉक पीएसओ, १२ आर्म्ड स्कॉट कमांडो, दोन वॉचर्स आणि ३ ट्रेन्ड ड्रायव्हर शिफ्ट मध्ये तैनात असतात.

मुख्य निवडणूक आयुक्त व अन्य आयुक्तांचा कार्यकाळ हा सहा वर्षांसाठी असतो. त्यांचे सेवानिवृत्ती वय हे ६५ व ६२ वर्षे अनुक्रमे असते. त्यांचे वेतन हे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींसारखेच असते. त्यांना संसदेत महाभियोग आणूनच हटविता येते. त्यांच्याकडे विधानसभा, लोकसभा, राज्यसभा, राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निवडणुका घेण्याचे अधिकार असतात.

# लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील २५२ उमेदवारांवर खून, बलात्कार आणि फसवणूकीचे गुन्हे

नवी दिल्ली : लोकसभा निवडणूक २०२४ साठी १९ एप्रिल रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात लढणाऱ्या उमेदवारांच्या गुन्हेगारी नोंदी तपासल्या असता धक्कादायक आकडेवारी उजेडात आली आहे.

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स आणि नॅशनल इलेक्शन वॉचने केलेल्या विश्र्लेषणामध्ये ही आकडेवारी पुढे आली. त्यानुसार लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात सहभागी झालेल्या १ हजार ६२५ उमेदवारांच्या स्व-प्रतिज्ञापत्रांच्या विश्र्लेषणानुसार, एकूण २५२ उमेदवारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत.

आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, २५२ पैकी ७ उमेदवारांवर खुनाचा आरोप आहे. तर १९ जणांवर खुनाचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

१६१ उमेदवारांवर गंभीर गुन्हे दाखल आहेत, तर १८ उमेदवारांवर महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांशी संबंधित आरोप आहेत. ३५ उमेदवार द्वेषयुक्त भाषणाशी संबंधित प्रकरणांमध्ये अडकले आहेत. याव्यतिरिक्त, १५ उमेदवारांनी त्यांच्या स्व-प्रतिज्ञापत्रांत त्यांना दोषी ठरविलेले प्रकरण घोषित केले आहेत. राजकीय पक्षांच्या संलग्नतेच्या बाबतीत, राष्ट्रीय जनता दल (आरजेडी) च्या चारही उमेदवारांनी स्वतः वर फौजदारी गुन्हे दाखल केले असल्याचे म्हटले आहे. याउलट, बहुजन समाज पक्ष मध्ये सर्वात कमी उमेदवार आहेत ज्यात गुन्हेगारी खटले आहेत. बसपच्या ८६ पैकी केवळ ११ उमेदवारांवर अशी नोंद आहे.

पहिल्या टप्प्यात ज्यांची एकूण संपत्ती १ कोटीपेक्षा जास्त आहे असे ४५० ङ्कोटीपतीफ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. यात भारतीय जनता पक्ष (भाजपा) ६९ करोडपती उमेदवारांसह आघाडीवर आहे. त्यानंतर काँग्रेस ४९ उमेदवारांसह, ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम (एआयएडीएमके) ३५ आणि द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके) २१ उमेदवारांसह आघाडीवर आहे. (पान ७ वर)

# आजपर्यंत लेकीला निवडून दिले आता सुनेला द्या

बारामती : १९९१ ला खासदारकीला लेकाला म्हणजे मला निवडून दिले, नंतर वडिलांना निवडून दिले म्हणजे साहेबांना, त्यानंतर लेकीला ३ वेळा निवडून दिले म्हणजे सुप्रियाला, आता सुनेला निवडून द्या असे आवाहन बारामतीच्या जनतेला अजित पवारांनी केले आहे. सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी अजित पवारांनी बारामतीत सभा घेतली.



या सभेत अजित पवार म्हणाले की, बारामतीत जवळपास ९० टक्के कामे मी स्वत: पुढाकार घेऊन केली आहेत. परंतु सध्या काहींनी आता पुस्तकेत हे आम्हीच केले असे लिहिले आहे. आताचे विद्यमान खासदार यांची पुस्तिका पाहिली त्यात नगरपालिकेची इमारत, ज्याला निधी मी दिला असे म्हणत अजित पवारांनी सुप्रिया सुळेंवर कामाचे श्रेय लाटत असल्याचा आरोप केला.

तसेच तुम्ही पहिल्यापासून पवारांच्या मागे उभे राहिलात, त्यामुळे जिथे पवार आडनाव असेल तिथे मतदान करायचे. त्यामुळे आपली परंपरा खंडित केली अशी भावना कुणाच्या मनात येणार नाही. ही निवडणूक देशाच्या भवितव्याची आहे. जागतिक पातळीवर मोदींनी देशाचे नाव वाढवण्याचा प्रयत्न केला हे त्रिवार सत्य आहे. मोदी दरदिवाळीला जवानांना प्रोत्साहन देत साजरी करतात असे कौतुक अजित पवारांनी नरेंद्र मोदींचे केले.

दरम्यान, बारामतीतून आमच्या विचारांचा माणूस निवडून दिला तर त्यातून विकास होणार आहे. याआधी फॉर्म भरल्यानंतर शेवटची एक सभा व्हायची. आता सगळीकडे का फिरावे लागत आहे? ही वेळ का आणली, बारामतीच्या विकासासाठी, जिल्ह्यासाठी महाराष्ट्रासाठी करतोय. मी शिव शाहू फुले आंबेडकरांची विचारधारा सोडली नाही. अठरापगड जातीच्या लोकांसाठी काम करतोय असेही अजित पवारांनी म्हटले.

# लोकसभा निवडणुकीत मोठे मताधिक्य देण्याचा लातूर ग्रामीण भाजपा कार्यकर्ता बैठकीत निर्धार



लातूर / प्रतिनिधी- देशाचे यशस्वी पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी साहेब यांना समर्थन देण्यासाठी लातूर लोकसभा निवडणुकीत भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना मोठे मताधिक्य देण्याचा निर्धार भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाच्या बैठकीत करण्यात आला. या बैठकीत अर्चना पाटील चाकूरकर यांनी देशहित आणि जनहित लक्षात घेऊन भारतीय जनता पार्टी प्रवेश घेतल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले.

लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाच्या प्रमुख पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधीची बैठक भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात सोमवारी दुपारी झाली. या बैठकीस बूथ प्रमुख अभियानाचे नरेंद्र काळे, अर्चना पाटील चाकूरकर, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, ज्येष्ठ नेते प्रदीप पाटील खंडापूरकर, युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा कराड, जिल्हा पंचायत राज व ग्रामविकास सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, लातूर ग्रामीण भाजपाचे अध्यक्ष (पान ७ वर)

# काँग्रेस भवनावर उभारली परिवर्तनाची विजयी संकल्प गुढी

लातूर प्रतिनिधी : देशातील जनतेचा विद्यमान सत्ताधाऱ्यांवर प्रचंड राग आहे. या परिस्थितीत परिवर्तन घडावे म्हणून आज राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे व आघाडीतील सर्व घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी मिळून मंगळवार दि. ९ एप्रिल रोजी गुढीपाडव्याच्या निमित्ताने लातूर येथील ऐतिहासिक काँग्रेस भवन येथे, मोठा गाजावाजा करीत विजयी संकल्प गुढी उभारली.

यप्रसंगी बोलताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले की, शेतीमालाला योग्य




हमीभाव मिळावा, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट व्हावे, तरुणांना रोजगार मिळावा, महागाई कमी व्हावी, संविधान सुरक्षित रहावे, लोकशाही मजबूत व्हावी, लातुर लोकसभा मतदार संघात नवीन उद्योग यावेत, महिलांची सुरक्षितता वाढावी, जनतेला आधुनिक आरोग्य सुविधा मिळाव्यात, नव्या पिढीला दर्जेदार शिक्षण मिळावे, पाणी टंचाई दूर व्हावी असे अनेक संकल्प करीत परिवर्तनाची विजयी संकल्प गुढी उभारली आहे. आजच्या दिवशी केलेला संकल्प पूर्णत्वास जातो अशी आमची श्रद्धा आहे. असेही आमदार देशमुख यांना म्हटले आहे.

यावेळी पूढे बोलतांना ते म्हणाले, (पान ७ वर)

# लातूर जिल्ह्यात गाव ते शहर झाला मतदान जागृतीचा जागर!



लातूर / प्रतिनिधी– लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये जिल्ह्यात मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत माझा एक दिवस मतदार जागृतीसाठी या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या निर्देशानुसार महिला मतदार जागृतीसाठी जिल्ह्यात एकाच वेळी ग्रामीण आणि शहरी भागात मतदार जागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सुमारे ५२ हजार ८०३ महिला, युवती आणि विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. लातूर येथे झालेल्या रॅलीचा समारोप जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा स्वीप कक्षाचे नोडल अधिकारी तथा नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, महानगरपालिका उपायुक्त शुभम क्यातमवार, दयानंद महाविद्यालयाचे डॉ. दिलीप नागरगोजे, स्वीप आयकॉन शृष्टी जगताप, माही आरधवाड यांची यावेळी उपस्थिती होती. रॅलीमध्ये सहभागी झालेल्या सुमारे ५२ हजार ८०३ महिला, युवती आणि विद्यार्थिनींच्या माध्यमातून जवळपास अडीच लाख कुटुंबांपर्यंत मतदार जागृतीचा संदेश पोहचविण्यात आला.

लातूर लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ७ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. आपली लोकशाही बळकट करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व मतदारांनी मतदानाचा हक्क बाजाविणे आवश्यक आहे. महिला मतदारांच्या मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्ह्यात सर्वत्र महिला मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या निवडणुकीत पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांच्या मतदानाची टक्केवारी अधिक रहावी, हा निश्चय करून महिला, युवतींनी इतर महिला मतदारांनाही मतदानासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी यावेळी केले.

लोकशाहीत निवडणुकीचे स्थान सर्वोच्च आहे. आपल्याला मिळालेला मतदानाचा हक्क बजावून प्रत्येक मतदाराने आपले कर्तव्य पार पाडावे. निवडणूक प्रक्रीये प्रत्येक मत हे अमुल्य आणि महत्वपूर्ण असल्याचे उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे म्हणाल्या.

लातूर जिल्ह्यात स्वीप अंतर्गत विविध उपक्रम राबवून नवमतदार ,महिला ,ट्रान्सजेन्डर ,भटके लोक यांच्या मतदार नांव नोंदणी बरोबर मतदान वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. ८५ वर्षेपेक्षा अधिक वय असलेल्या जेष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांना घरून मतदान करण्याची सुविधा यावेळी उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे यावेळी म्हणाले. जिल्ह्यातील महिला मतदारांची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप उपक्रमांतर्गत जिल्ह्यात गाव ते शहर सर्वत्र महिला मतदार जागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीला सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

स्वीप आयकॉन शृष्टी जगताप, माही आधरवाड यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. दयानंद महाविद्यालय, शाहू महाविद्यालय आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील विद्यार्थिनी या रॅलीमध्ये सहभागी झाल्या होत्या.

लातूर जिल्ह्यातील प्रत्येक गावातून व शहरातून रॅलीच्या माध्यमातून महिला आणि विद्यार्थिनींनी मतदार जागृती केली. एकाच दिवशी संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात आलेली ही मोहीम लक्षवेधक ठरली. स्वीप समन्वयक रामेश्वर गिल्डा, राबसाहेब आंबरे, विजय मालाळे, डॉ. नितीन जायभाये, मधुकर टमाले, गुरबस स्वामी, ऋषिकेश पवार, अमित तुमकुटे यांनी रॅली यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

**पोवाडा, पथनाट्यद्वारे मतदार जागृती**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत स्वीप उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत लातूर येथे आयोजित महिला मतदार जनजागृती रॅलीच्या समारोप प्रसंगी दयानंद महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संदिपान जगदाळे यांनी मतदार जागृतीचा पोवाडा सादर केला. तसेच विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे मतदानाचे महत्व पटवून दिले.

**विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; पाटीवर लिहिले मतदार जागृतीचे संदेश**

स्वीप उपक्रमांतर्गत जिल्ह्यात आयोजित महिला मतदार जागृती रॅलीमध्ये आशा, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, शिक्षक यांच्यासह विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. विविध घोषवाक्य लिहिलेले फलक हातात घेवून हे विद्यार्थी रॅलीत सहभागी झाले होते. तसेच काही गावांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेतील पाटीवर मतदान जागृतीचे संदेश लिहून रॅलीमध्ये सहभागी झाले होते. यासोबत विविध घोषणा देवून मतदारांना मतदानाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न यावेळी विद्यार्थ्यांनी केला.

## तंत्रज्ञान ही शेतकऱ्यांसाठी संजीवनी

लातूर : प्रतिनिधी- एकविसाव्या शतकात आज प्रत्येकाकडे मोबाईल, टॅबलेट उपलब्ध आहे. रोजच्या दैनंदिन व्यवहारासोबतच शेतक-यांनीही शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास तंत्रज्ञान ही शेतक-यांसाठी संजीवनी ठरेल असे मत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणि यांनी व्यक्त केले. कृषि महाविद्यालय, लातूर येथे कुलगुरू डॉ. इंद्र मणि यांनी विविध उपक्रमांना तसेच रासायनिक शेतीतून टप्पा टप्प्याने एकात्मिक शेतीकडे वाटचाल या प्रकल्पास भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, डॉ. विश्वनाथ कांबळे, डॉ. दिनेशसिंह चौहान, डॉ. प्रशांत करंजीकर, डॉ. व्यंकट जगताप, डॉ. संतोष कांबळे, डॉ. विजय भामरे, डॉ. राजेश शेळके, डॉ. ज्योती देशमुख, डॉ. अनंत शिंदे, डॉ. पद्माकर वाडीकर, डॉ. अनिलकुमार कांबळे, डॉ. विनोद शिंदे, डॉ. सुनीता मगर, डॉ. ज्ञानेश्वर सुरडकर, डॉ. दयानंद मोरे, डॉ. संघर्ष शृंगारे, डॉ. अजित पुरी, भगवान कांबळे, राहुलदेव भवाळे, देविदास चामणीकर इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कृषि महाविद्यालय हे नेहमी शेतक-यांना त्यांच्या समस्या निराकरण करणारा सच्चा दोस्त वाटावा. याप्रकारे महाविद्यालयाने आगामी काळातही अशीच वाटचाल करावी याकरिता शुभेच्छा देत डॉ. मणि यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून त्यांना शैक्षणिक प्रगतीविषयी मार्गदर्शन केले. तसेच कार्यानुभवातून शिक्षण या उपक्रमाच्या माध्यमातून निर्मित विविध वस्तूंची पाहणी करून त्यांचे कौतुक केले.







## शिक्षण विस्तार अधिकारी संघटनेची नवीन कार्यकारिणी जाहीर

### अध्यक्ष शिवाजी नाईकवाडे तर सचिव किशन फोले

नांदेड (प्रतिनिधी):- नांदेड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विस्तार अधिकारी संघटनेची जिल्हास्तरीय बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीत नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून उपक्रमशील शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजी नाईकवाडे यांची अध्यक्षपदी तर हदगावच्या गटशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार असलेले शिक्षण विस्तार अधिकारी किशन फोले यांची सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हा संघटनेच्या नवीन कार्यकारिणी मध्ये शिक्षण विस्तार अधिकारी कृष्णकुमार फटाले आणि शोभा भारती यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात उपशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे शिक्षण विस्तार अधिकारी संतोष शेटकर यांच्याकडे कार्याध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. तर कोषाध्यक्ष पद शिक्षण विस्तार अधिकारी केशव मेकाले यांना देण्यात आले आहे. तसेच शिक्षण विस्तार अधिकारी संजय येरमे, सुरेश पाटील, प्रवीणा मांदळे, हमीद दौलताबादी, लोकदाजी गोडबोले यांची संघटक म्हणून निवड करण्यात आली आहे. शिक्षण विस्तार अधिकारी संवर्गातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी तसेच जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे अध्यक्ष शिवाजी नाईकवाडे यांनी सांगितले.

## सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन मकार्यालय व दवाखाना पसिरात अवैध धंदे बंद करा

लातूरः सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन मकार्यालय व दवाखाना पसिरात अवैध धंदे बंद करावेत. नेताजी नगर परिसरातील स्थानिक रहिवासी व व्यावसायिक यांनी दि. ३ एप्रिल रोजी मा. पोलीस अधीक्षक साहेब, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

या दिलेल्या निवेदनात त्यांनी असे म्हटले आहे की, पशुसंवर्धन कार्यालय व पशुवैद्यकीय दवाखाना परिसरात स्थानिक मोकाट व गुंडप्रवृत्तीचे मुले वावर करून त्याद्वारे त्यांचे अवैध धंदे जसे, दारू पिणे, गांजा ओढणे, झुगार खेळणे, कोणासोबतही भांडणे व इतर प्रकारचे धंदे व गैरप्रकार सर्रासपणे चालू असून त्यामुळे येथील राहणारे ज्येष्ठ नागरिक, मुले व महिलांना या ठिकाणी नाहक त्रास होत आहे. त्याचबरोबर दवाखाना पसिराच्या बाहेरील व्यावसायिकांना सुद्धा याचा खूप त्रास होत आहे. दवाखाना परिसरात मोकाट मुलांचा वावर व अवैध धंदे दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे या ठिकाणी ये-जा करणाऱ्या महिला व मुलींना घराबाहेर येणे अत्यंत जिकरीचे झालेले आहे.

तसेच श्री केशवराज शाळा जवळ असल्याने तेथे लहान मुले मुली व त्यांचे पालक सतत ये-जा करत असतात त्यांना सुद्धा हे गुंडप्रवृत्तीचे लोक विनाकारण त्रास देतात. तसेच सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन कार्यालय व दवाखाना बंद झाल्यास सायंकाळी वरील गुंडप्रवृत्ती व मोकाट मुलांचे गैरकृत्य, गैरवर्तन व सततचे भांडण- तंटे वाढल्यामुळे येथील नागरिक, कर्मचारी व व्यवसायिक यांना खूप त्रास होत आहे. तरी मे. साहेबांनी वरील बाबीचा गांभीर्याने विचार करून सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन मकार्यालय व दवाखाना पसिरात अवैध धंदे बंद करून शांतता व सुव्यवस्थेचा भंग करणाऱ्या व्यक्तींवर कार्यवाही कायदेशीर करण्यात यावी. अशी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे. या दिलेल्या निवेदनावर ॲड. अमित सोमनाथ रोडे, हेमंत जाधव, विशाल राठोड, देवता वठ्ठलराव देशमुख, पत्रकार जावेद शेख यांच्यासह ८५ नागरिकांच्या या दिलेल्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

## शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये रंगोत्सव स्पर्धेचे बक्षीस वितरण




**लातूर,** - शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये आज इंटरनॅशनल लेव्हल रंगोत्सव कला स्पर्धेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लंडन येथील सुप्रसिध्द डॉक्टर वैशाली पाटील या होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लातूर कलाध्यापक संघाचे अध्यक्ष अशोक तोगरे, शारदा सेमी इंग्लिश स्कूलचे प्राचार्य लक्ष्मण पुरी, कलाशिक्षिका प्रियल गोखले उपस्थित होते.

प्रारंभी दीपप्रज्ज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. रेणुका समुद्रे आणि उषा गुडदे यांनी स्वागतगीत सादर केले. या स्पर्धेत इयत्ता चौथीमधील श्रावणी विवेकानंद आर्य हिला द्वितीय पुरस्कार मिळाला. तिला अलेक्सा, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र मिळाले. इयत्ता तिसरीतील रचना लक्ष्मीकांत मोरे व इयत्ता सातवीतील गौरवी अरुण धाराशिवे या दोन विद्यार्थिनींना इंटरनॅशनल आर्ट मेरिट अवॉर्ड मिळाल्याने सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

इयत्ता पहिलीतील वेदांती वीरनाथ औरादे, इयत्ता दुसरीतील अर्पिता अशोक ननवरे, आर्या अमोल काळकुटे, रुद्रानी राम सुडे, संबोधी यशपाल सितापे, इयत्ता तिसरीमधील विराज अजय चव्हाण, पार्थ राहुल सुतार, इयत्ता पाचवीतील ओम प्रमोद पवार, शौर्य अरुण धाराशिवे, इयत्ता सातवीतील मयूर योगेश महामुनी, इयत्ता नववीमधील श्रुती श्रीकांत केंद्रे यांना इंटरनॅशनल मेडल व प्रमाणपत्र मिळाले. इयत्ता पाचवीमधील श्रुती सचिन गाडे, रुद्रानी गंगाधर पाचेगावकर, अनस सादिक पिरजादे व इयत्ता सातवीमधील यश भीमराव लहाने या चार विद्यार्थ्यांना कॉन्सोलेशन प्राईज मिळाले आहे. स्पर्धेच्या आयोजकांकडून शाळेला ग्लोबल स्कूल अवॉर्ड मिळाले आहे. प्राचार्य पुरी यांना वर्ल्ड वाईड हायेस्ट परफॉर्मन्स अवॉर्ड तर कला शिक्षिका प्रियल गोखले यांना साल्वोदार दाली हा अवॉर्ड मिळाले आहे. यावेळी डॉ. वैशाली पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन प्राथमिक वर्गाच्या समन्वयक अश्विनी पवार यांनी तर प्रास्ताविक लिंबराज गायकवाड यांनी केले. शीतल नडगिरे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी शिक्षक, विद्यार्थी, पालक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## आयएमएच्या मिशन पिंक हेल्थच्या माध्यमातून किशोरवयीन मुलींसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन




लातूर : इंडियन मेडिकल असोसिएशन अर्थात आयएमएच्या मिशन पिंक हेल्थच्या माध्यमातून विद्यालयीन तसेच महाविद्यालयीन मुलींसाठी आरोग्य विषयक मार्गदर्शन शिबिरांचा उपक्रम मिशन पिंक हेल्थच्या अध्यक्षा डॉ. सौ.वृंदा कुलकर्णी व त्यांच्या सहकारी तज्ज्ञ महिला डॉक्टर्सच्या कुशल नेतृत्वाखाली अत्यंत यशस्वीरीत्या राबविण्यात आला.

मकर संक्रमणाच्या काळात महिला वेगवेगळ्या प्रकारचे वाण लुटतात. परंतु मिशन पिंक हेल्थच्या महिला डॉक्टर्सनी कर्तव्यभावनेने विद्यालयीन तसेच महाविद्यालयीन किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य विषयक मार्गदर्शनाच उपक्रम अत्यंत व्यवस्थितरीत्या राबविला. मिशन पिंक हेल्थच्या अध्यक्षा डॉ. सौ.वृंदा कुलकर्णी यांनी यासंदर्भात विस्तृत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, विवेकानंद विद्यालय (गंगापूर), जवाहर नवोदय शाळा, सरस्वतीदेवी आश्रमशाळा (चिंचोलीराव वाडी), जिजामाता कन्या शाळा व दयानंद कनिष्ठ वाणिज्य विद्यालय या सर्व संस्थांमधील जवळपास १४०० किशोरवयीन विद्यार्थिनी व विद्यार्थी तसेच ३५० माता पालकांना आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. मासिक पाळी, त्यातील समस्या,मासिक पाळीत घ्यावयाची स्वच्छता, रक्तक्षय(एनिमिया)व योग्य आहार,समाजमाध्यमे व त्याचे दुष्परिणाम, चांगला व वाईट स्पर्श यातील फरक याबाबत मुलींना, महिलांना सविस्तर माहिती देण्यात आली. त्यांच्या विविध शंकांचे व समस्यांचे निरसनही करण्यात आले. या अभिनव उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्षा डॉ. वृंदा कुलकर्णी , सेक्रेटरी डॉ. रचना जाजू,डॉ. सुरेखा काळे, डॉ.अमृता पाटील, डॉ. कल्पना किनीकर, डॉ. सगीर पठाण या स्त्रीरोग तज्ञांनी हे मार्गदर्शन केले. कार्यक्रम आयोजित करण्यात डॉ.वृंदा कुलकर्णी, डॉ. सुरेखा काळे,डॉ. कल्पना किनीकर, डॉ. स्नेहल देशमुख यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉ. अनिल राठी, सचिव डॉ. चेपूरे तसेच संपूर्ण आयएमए परिवाराचे सहकार्य लाभले.

## लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नियुक्त सूक्ष्म निरीक्षकांचे प्रथम प्रशिक्षण पूर्ण

लातूर, : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर मतदारसंघामध्ये नियुक्त सूक्ष्म निरीक्षकांचे पहिले प्रशिक्षण शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात झाले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

उपजिल्हाधिकारी संगिता टकले, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियंका आयरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी आप्पासाहेब चाटे, नायब तहसिलदार पंकज मांदाडे यावेळी उपस्थित होते. सूक्ष्म निरीक्षकांना निवडणूक प्रक्रियेची माहिती, निवडणूक नियमांचे पालन कसे करावे आणि निवडणूक प्रक्रिया सुरळीत होण्यासाठी घ्यावयाची काळजी, मॉकपोल कसे घ्यावे, याबाबत प्राथमिक प्रशिक्षण याप्रसंगी देण्यात आले.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी सूक्ष्म निरीक्षकांची संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत महत्वपूर्ण भूमिका असल्याचे सांगत मतदान कक्षात मतदान केंद्राध्यक्ष, निवडणूक अधिकारी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करीत आहेत किंवा कसे, मतदान यंत्र सुस्थितीत व योग्यप्रकारे कार्यान्वित झाली आहेत का, मतदान केंद्रांवर किमान मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची खात्री सूक्ष्म निरीक्षकांनी करावी.

लोकशाही व्यवस्थेत मतदान प्रक्रियेला अतिशय महत्व आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडावी, यासाठी भारत निवडणूक आयोगाने विविध नियम केलेले आहेत. त्यानुसार मतदान प्रक्रिया पार पडत असल्याची खात्री सूक्ष्म निरीक्षकांनी करावी. तसेच भारत निवडणूक आयोगामार्फत नियुक्त निवडणूक निरीक्षकाचे प्रतिनिधी म्हणून सूक्ष्म निरीक्षक यांनी जबाबदारी पार पाडावी, असे सहायक निवडणूक अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे यांनी सांगितले. उपजिल्हाधिकारी संगिता टकले यांनी टपाली मतदानाविषयी मार्गदर्शन केले. ८५ वर्षांवरील मतदार तसेच ४० टक्क्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग मतदार यांचे मतदान त्यांच्या घरी जावून पूर्ण करून घेण्यात येणार आहे. ही मतदान प्रक्रियाही सूक्ष्म निरीक्षक यांच्या निगराणीखाली होणार असल्याचे त्यांनी सांगितले. निवडणूक खर्च निरीक्षक अप्पासाहेब चाटे यांनी निवडणूक खर्च संनियंत्रणाच्या अनुषंगाने महत्वाच्या बाबींची माहिती दिली.

## देगलूरात साधना प्राथमिक शाळेत शुभेच्छा सोहळा संपन्न

देगलूर(प्रतिनिधी): शहरातील साधना प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी दि.०८ एप्रिल सोमवार रोजी शुभेच्छा समारंभाचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापिका सौ जयश्री तांदळे, प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध बालकवी श. ल. नाईक, श्री संत गाडगेबाबा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विठ्ठलरेड्डी भुतन्नहिप्परगेकर, सचिव संग्राम अप्पा मळगे, सदस्य बाळासाहेब देशमुख कावळगावकर, सदस्य राजेश जाधव हाळीकर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सोपानराव रेनगुंठवार, साधना हायस्कूलचे मुख्याध्यापक यादव बत्तुलवार, ज्ञान प्रभा कन्या शाळेतील मुख्याध्यापिका प्रतिनिधी सौ. प्रेमला जबडे, ज्येष्ठ शिक्षिका सुशिलाबाई वाघमारे आदींसह शाळेतील सांस्कृतिक विभाग प्रमुख तथा संयोजक सौ. ज्योती देगावकर, वैशाखी वाघमारे, अभ्यासपूरक मंडळप्रमुख प्रमोद मिसाळे,इयत्ता तिसरीचे वर्गशिक्षक राजू भंडरवार, रूद्राक्ष पाटील, विठ्ठल धुमाळे, इयत्ता चौथीचे वर्गशिक्षक राजकुमार कस्तुरे पाटील, उमाकांत पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आले यावेळी मंचावरील सर्वांचे सन्मान करण्यात आले व महिला, पुरुष उपस्थित सर्व पालकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्षा तथा मुख्याधिपीका सौ. जयश्री तांदळे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या जीवनात संस्कार व अभ्यास किती महत्वाचे आहेत याची मुलांना जाणीव करून देत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले प्रसिद्ध बालकवी श. ल. नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आपल्या कवीता सादरीकरण केले. नाईक यांनी बनवलेले कवितेचा विद्यार्थ्यांनी न कंटाळता एक तास मनमुरादपणे आनंद घेतला. मुअ. यादव बत्तुलवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पालकांना सुचना केली कि आपल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हित जोपासण्यासाठी विद्यार्थ्यांच्या हातातील विनाकारण वावरत असलेल्या मोबाईलचा वापर कमी करावा असे सांगितले. त्यानंतर इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी चौथीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांनी शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त करून आपले मनोगत व्यक्त केले. इयत्ता चौथीसाठी अध्यापन करणारे सर्व शिक्षक, शिक्षीका यांनीही मुलांना मार्गदर्शन करत वैशाखी




वाघमारे व ज्योती देगावकर या दोघांच्यावतीने स्वखर्चाने चौथीतील सर्व विद्यार्थ्यांना भेटवस्तू भेट देऊन शुभेच्छा दिल्या . शेवटी विद्यार्थ्यांना सेवक सायाराम दोसलवार व गोविंद बोडके यांनी खमंग खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजकुमार कस्तुरे पाटील, प्रमोद मिसाळे, सागर उल्लेवार, सौ. संगीता सुभेदार, सौ. विजयश्री ऐकाळे, राजू भंडरवार आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल धुमाळे यांनी केले तर आभार रूद्राक्ष पाटील यांनी मानले.

यावेळी अनेक महिला व पुरुष पालकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

यशवंत धाराशिव जिल्हा
बुधवार दि. १० एप्रिल २०२४
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com


## चोरट्यांनी विद्युत तारांसह चंदनाच्या झाडांवर मारला डल्ला

धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) – चोरट्यांनी आपला मोर्चा वाहिनीच्या तारा चोरण्यासह चंदनाची झाडे चोरून नेण्याकडे वळविला आहे. वहिनीच्या सारा व चंदनाची झाडे असा एकूण ७० हजार रुपयांवर डल्ला मारून ते फरार झाले आहेत.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, तुळजापूर हंगरगा तुळ येथील सचिन गणपती ननवरे (वय ४५ वर्षे) यांच्या शेतातील विहीर व बोर वरील अंदाजे ४५० फुट केबल व २ चंदनाची झाडे असा एकूण ४४ हजार रुपये किंमतीचा माल सुरज शिंदे, अजय काळे व इतरांनी दि. ६ एप्रिल रोजी १० ते १२ वाजण्याच्या सुमारास चोरुन नेले. या प्रकरणी सचिन ननवरे यांनी दि.८ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात ३७९, ३४ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तर धाराशिव तालुक्यातील पळसप येथील दादा सरडे यांच्या जमीन गट क्र. २६४ मधील ९ पोलवरील अंदाजे ३० हजार रुपयांची लघुविद्युत वाहिणीची तार अज्ञात व्यक्तींनी दि.५ फेब्रुवारी २०२४ रोजी ९.३० वाजण्याच्या सुमारास चोरुन नेली. या प्रकरणी पळसप ह.मु. मोदी नगर मुरुड येथील प्रविण संदीपान माळी (वय ३५ वर्षे), व्यवसाय नोकरी यांनी ढोकी पोलीस ठाण्यात दि.८ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून ३७९, ३४ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

# २०१४ ला जनता मोदींच्या समर्थनार्थ मात्र २०२४ ला विरोधात !

## प्रत्येकी १५ लाख देण्यासह अच्छे दिनची भूरळ नडली




मल्लिकार्जुन सोनवणे

धाराशिव दि.९ – लोकशाही प्रिय असेलेली जनताच भारतात आपले सरकार निवडते. २०१४ साली केंद्रातील तत्कालीन आघाडी सरकारला जनता प्रचंड वैतागल्यामुळे सरकारच्या विरोधात होती. मात्र नेतेमंडळी भारतीय जनता पार्टी अर्थात नरेंद्र मोदी यांच्या प्रचंड विरोधात होते. निवडणुकीमध्ये जनतेने नरेंद्र मोदी यांच्या बाजूने कौल देत त्यांना सत्तेवर विराजमान केले. यंदा म्हणजेच २०२४ साली अगदी या विरुद्ध परिस्थिती निर्माण झाली असून नेते मंडळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे समर्थन करीत आहेत. मात्र लोकशाहीचा राजा म्हणजेच जनता मोदींच्या विरोधात असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेष म्हणजे स्विच बँकेत भ्रष्टाचारी मंडळींनी दडवून ठेवलेले काळे धन भारतात आणून भारतातील नागरिकांच्या खात्यावर प्रत्येकी १५ लाख रुपये देण्यासह अच्छे दिनची टाकलेली भूरळ सर्वांनाच पडली होती. मात्र १० वर्षानंतर नेमकी विरोधात परिस्थिती निर्माण झाली असून अच्छे दिनची भुरळ नडल्याचे चित्र आहे.

२०१४ पूर्वी देशात महागाई, वाढती बेकारी, महिलांवरील वाढत्या अन्याय अत्याचाराच्या घटना, दररोज नवनवीन भ्रष्टाचाराची प्रकरणे, शेतकरी आत्महत्या, जीएसटी धोरणास विरोध, शेतीमालास हमी भाव, धनगर आरक्षण, मराठा आरक्षण, लिंगायत धर्मास मान्यता, लोकपाल विधेयक लागू करण्यात यावे, दरवर्षी २ कोटी नोकऱ्या निर्माण केल्या जातील, समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय पातळीवर स्मारक उभारणे, मुंबई इंदू मिलच्या जागेवर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय पातळीवर स्मारक उभारणे, येथील यांसह विविध प्रकारच्या मुद्द्यांवर भारतीय जनता पार्टीचा प्रधानमंत्रीपदाचा चेहरा असलेले नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून सर्वत्र सत्ताधाऱ्यांच्या विरोधात राळ उडून गेली होती. जनता देखील प्रचंड संताप झाल्याने त्यांना नवीन पर्याय हवा होता तो नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून उपलब्ध होईल अशी आशा त्यांना लागून राहिली होती. त्यातच मोदी व पतंजली प्रमुख रामदेव बाबा यांनी विदेशातील बँकेमध्ये ठेवलेले काळे धन आम्हाला सत्ता दिल्यास ते आणून भारतातील जनतेच्या खात्यावर प्रत्येकी १५ लाख रुपये वर्ग केले जातील असे आश्वासन दिले होते. त्यामुळे देशातील जनता या आश्वासनावर प्रचंड भाळली. निवडणूक प्रचार दरम्यान भाजप प्रणित राष्ट्रीय लोकशाही

**महागाई कमी करणे, भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन करणे, विदेशी बँकांतील काळा पैसा आणणे, बेकारी कमी करणे, नोकऱ्या उपलब्ध करणे, उद्योग धंदे निर्माण करणे तसेच शेतकऱ्यांच्या मालाला स्वामीनाथन आयोगाने लागू केलेल्या शिफारशीनुसार भाव देणे, छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारणे, धनगर आरक्षण, मराठा आरक्षण, लिंगायत धर्मास मान्यता आदींसह विविध प्रश्न सोडविण्यामध्ये विद्यमान केंद्रातील मोदी सरकारला अपेक्षित यश मिळालेले नाही. त्यामुळे जनतेमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. ज्याप्रमाणे २०१४ साली केंद्रातील तत्कालीन मनमोहन सिंग सरकारच्या विरोधात जनता होती. अगदी तशीच परिस्थिती २०२४ साली केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या विरोधात निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे.**

आघाडीच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ प्रचंड प्रतिसाद मिळत होता. त्यामुळे केंद्रात भाजप व मित्र पक्षाचे सरकार बहुमताने आरुढ झाले होते. मात्र सत्तेवर आल्यानंतर या सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण करण्याकडे सपशेल दुर्लक्ष केले. त्यामुळे काहीजणांनी भाजपाने जाहीरनाम्यात दिलेले आश्वासन पूर्ण करीत नसल्यामुळे सर्वोच्च न्यायालयामध्ये खेचले. तर सर्वोच्च न्यायालयाने देखील भाजपला सत्तेवर आल्यानंतर १५ लाख रुपये प्रत्येक भारतीयांच्या खात्यावर वर्ग करणार असल्याच्या दिलेल्या आश्वासनाची पूर्तता का केली नाही ? याबाबत विचारणा केली. त्यावेळी भाजपाने ते आश्वासन फक्त एक निवडणूक जुमला होता असे सांगितले. त्यातच राज्यसह देशाच्या विविध राज्यांतील इतर पक्षांतील आमदार फोडून भारतीय जनता पार्टीने तेथे आपले सरकार स्थापन केले आहे. तर महाराष्ट्रात शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये उभी फूट पाडली. एकीकडे भाजपने महादेव जानकर, सदाभाऊ खोत व इतर छोट्या मोठ्या पक्षाच्या नेत्यांना भाजपसोबत घेऊन महायुती करुन लोकसभेच्या निवडणुकीमध्ये उमेदवार उतरविले आहेत. तर दुसरीकडे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस, शिवसेना (ठाकरे), राष्ट्रीय भारतीय काँग्रेस (आय) व इतर छोटे मोठे पक्ष यांना सोबत घेऊन महाविकास आघाडीच्या माध्यमातून उमेदवार उतरविले आहेत. तसेच वंचित बहुजन आघाडीने स्वतंत्र निवडणुकीचा मार्ग पत्करला आहे. मात्र काही ठिकाणच्या जागांवर्रीं ॅंड बाळासाहेब आंबेडकर यांनी काँग्रेस व राष्ट्रवादीच्या उमेदवारांना पाठिंबा देखील जाहीर केलेला आहे. त्यामुळे या निवडणुकांमध्ये काही जागांवर दुरंगी, तिरंगी व बहुरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

## वेड्याचे प्रमाणपत्र काढल्याचे सांगत बापलेकाला बेदम मारहाण

धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) – वेड्याचे प्रमाणपत्र काढले आहे असे सांगत चौघाजणांनी बापलेकास लाथाबुक्क्या व लोखंडी फायटरने बेदम मारहाण करुन जबर जखमी केल्याची घटना घडली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, धाराशिव तालुक्यातील वाघोली येथील समाधान रामकिसन पिंपळे, गोरोबा विजयकुमार पिंपळे, विजयकुमार पांडुरंग पिंपळे व श्रीकृष्ण रामकिसन पिंपळे यांनी दि.४ एप्रिल रोजी १० ते १०.३० वाजण्याच्या सुमारास वाघोली येथे विक्रम विश्वनाथ मगर (वय ५४ वर्षे) यांना व त्यांचा मुलगा वैभव मगर यांना माझे वेड्याचे प्रमाणपत्र काढले आहे असे म्हणून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, लोखंडी पाईप फायटरने मारहाण करुन गंभीर जखमी केले. या प्रकरणी विक्रम मगर यांनी दि.८ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण प्रकरणी ॲट्रॉसिटी दाखल

धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) – एका व्यक्तीस विटांचे भाव ठरविण्यासाठी बोलावून घेऊन ६ जणांनी हत्याराने मारहाण केली. तसेच जातीवाचक शिवीगाळ करीत सोन्याची अंगठी व खिशातील रोख रक्कमेची चोरी करीत जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना तुळजापूर येथे घडली आहे. या प्रकरणी संबंधितावर अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अर्थात ट्रॉसिटी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तुळजापूर येथील सुनिल पवार, सोमा पवार, बाळु शिंदे, विकी मंडोळे, यलाप्पा मंडोळे व लक्ष्मण पवार यांनी दि.३ एप्रिल रोजी नवीन बस स्थानकासमोर तुळजापूर येथील मातंग नगर शुक्रवार पेठतील गंगाराम अनिल हजारे (वय– ३२ वर्षे) यांना विटभट्टीवरील विटाचे भाव ठरण्यासाठी बोलावून घेवून गैरकायद्याची मंडळी जमवून जातीवाचक शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, स्टीलचा कोयता व रॉडने मारहाण करुन जखमी केले. तसेच हजारेंच्या एक तोळ्याची अंगठी व खिशातील २११५ रुपये काढून घेतले. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी गंगाराम हजारे यांनी दि.८ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात ३२७, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८, १४९ भा.दं.वि.सं. अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३ (२) (व्हि.अ) अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

## विश्वासघात केल्या प्रकरणी भामट्यांवर गुन्हा दाखल

धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) – विविध धातूच्या मुर्त्या आणून देतो असा विश्वास देऊन मुर्त्या घेऊन गेले. मात्र अद्यापपर्यंत त्या मुर्त्या आणून दिल्या नसून त्यांनी विश्वासघात केला आहे. या प्रकरणी फसविणाऱ्या ६ भामट्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील नांदुर येथील आश्रुबा संपत्ती काळे, नाना जालिंदर काळे, विष्णु काळे, रुक्मिणी जालिंदर काळे, संजुबाई आश्रुबा काळे व दादा विष्णु काळे यांनी दि. १८ मार्च रोजी रोजी ६ वाजण्याच्या सुमारास कळंब मार्केट यार्डातील कमलाबाई राजा काळे (वय ६५ वर्षे) यांना विश्वासत घेवून वरील नमूद आरोपींनी त्यांच्याकडून १३ ग्रॅम वजनाची कालिका देवीची मुर्ती, पिवळे धातु असलेल्या ३ ग्रॅम वजनाची भैरवनाथ देवाची मुर्ती, ३ तोळे वजनाची पांढऱ्या धातुच्या देवाची मुर्ती परत आणून देतो म्हणून घेऊन जाऊन कमलाबाई काळे यांचा विश्वासघात केला. या प्रकरणी कमलाबाई काळे यांनी दि. ८ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून कळंब पोलीस ठाण्यात कलम ४०६, ३४ भा.दं. वि.सं. अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

## महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांची जयंती विविध प्रबोधनात्मक उपक्रमाने होणार साजरी



मुरूम दि.९ (प्रतिनिधी) – येथील भीमनगरमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या वतीने महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्तरित्या जयंती साजरी होणार आहे. त्या निमित्त दि. ११ ते २८ एप्रिल या कालावधीत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम घेतले जाणार आहेत. दि. ११ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता महात्मा फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करून भीमनगर येथील जिल्हा परिषद स्पेशल शाळा व परिसर स्वच्छता अभियान तर दि.१४ रोजी सकाळी ९ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन व ध्वजारोहन तसेच दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत मोनिका प्रतिक फुगारे–भालेराव यांच्यावतीने स्नेहभोजन, सायं. ६ वाजता शहरातून मोटारसायकल रॅलीचे आयोजन, दि. १५ रोजी सायं ७ वाजता वक्तृत्व स्पर्धा, दि. १६ रोजी निबंध स्पर्धा, दि. १७ रोजी सर्वरोग निदान शिबिर व सायं. ७ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील चेतन चोपडे प्रस्तुत तुझ्या पाऊल खुणा भीमराया हा संगीत रजनी कार्यक्रम, दि. १८ रोजी आधार कार्ड नोंदणी, दुरुस्ती, पोस्ट खाते व जात प्रमाणपत्र काढणे आदी भारत गायकवाड यांच्या वतीने मोफत आयोजन, सायं. ७ वाजता सोलापूर येथील वसुंधरा कला महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ. मिना देवीदास गायकवाड यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्रीविषयक विचारांची काळसमर्पकता या विषयावर व्याख्यान, दि. १९ रोजी महिलांसाठी पाककला व सायं. ७ वाजता अंबेजोगाई येथील खोलेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे यांचे अष्टपैलू डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर व्याख्यान, दी. २० रोजी रांगोळी, प्रश्न मंजुषा स्पर्धा, दि.२१ रोजी प्रतिभा निकेतन विद्यालयात जिल्हास्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा, दि. २२ रोजी पूर्णा येथील भन्ते डॉ. भदंत उपगुप्त महा थेरो यांचे धम्मदेसना, दि.२३ रोजी बुद्धिबळ स्पर्धा व सायं. ७ वाजता कवी रवींद्र केसकर यांचे सर्वांची आई–माता रमाई या विषयावर व्याख्यान, दि.२४ रोजी विविध गुण दर्शन, दि. २५ रोजी मान्यवरांचा सत्कार व बक्षीस वितरण, दि. २६ रोजी कुणाल वराळे, छत्रपती संभाजीनगर प्रस्तुत युगपुरुष हा संगीत रजनी कार्यक्रम, दुपारी १२ ते ५ या वेळेत शिवाजी कांबळे यांच्या वतीने स्नेहभोजन, दि. २८ रोजी दुपारी ३ वाजता गौतम बुद्ध, जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक आयोजित करण्यात येणार असल्याने तालुका व परिसरातील फुले–शाहू–आंबेडकर विचाराच्या अनुयायांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन समितीचे अध्यक्ष महेंद्र गायकवाड, उपाध्यक्ष राहुल गायकवाड, सचिव चंद्रकांत गोडबोले व कोषाध्यक्ष रवींद्र कांबळे यांनी केले आहे.

## परंडा येथे खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ आढावा बैठक



परंडा दि.९ (प्रतिनिधी) – महाविकास आघाडीचे उमेदवार खा राजेनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ शिवसेना माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांच्या आदेशाने परंडा येथे आढावा बैठक दि.८ एप्रिल रोजी घेण्यात आली.

परंडा येथे महाविकास आघाडीचे उमेदवार खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ घेण्यात आलेल्या आढावा बैठकीस संपर्क प्रमुख काटमोरे, जिल्हाप्रमुख रणजित पाटील, तालुका प्रमुख मेघराज पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शहर प्रमुख रईस मुजावर, युवा सेना शहर प्रमुख कुणाल जाधव, युवा सेना तालुका प्रमुख शिवाजी देवकर, महिला तालुका प्रमुख छायाताई जोगदंड, महिला उपतालुका प्रमुख कांचन ताई देवकर, महिला उपशहर प्रमुख सायरा अझरोद्दीन तुटके, बाजार समितीचे सभापती जयकुमार जैन, माजी नगराध्यक्ष सुभाष शिंदे, माजी उपनगराध्यक्ष इस्माईल कुरैशी, जनार्धन मेहेर, डॉ अब्बास मुजावर, माजी नगरसेवक मकरंद जोशी, माजी नगरसेवक इरफान शेख, विनोद साळवे, संजय कदम, मन्नान बासले, संचालक जावेद बागवान, उपसभापती संजय पवार, किरण शिंदे, जेष्ठ शिवसैनिक दिलीप रणभोर, दत्ता मेहेर, मधुकर गायकवाड, संतोष गायकवाड, प्रशांत गायकवाड, तुकाराम गायकवाड, बालाजी गायकवाड, दिपक गायकवाड, रफिक मुजावर, एजाज मुजावर, शाहरूख मुजावर, साबेर मुजावर, सद्दाम मुजावर, उमेश परदेशी, दत्तात्रय धनवे, सत्तार पठाण, अक्षय गवारे, जिशान काझी, अंकुश डांगे, बुद्दीवान गोडगे, बुद्दीवान लटके, ओंकार गायकवाड, सागर शिंदे, माणिक शिंवे, रोहीदास गोफणे, वसिष्ठ जसकर , रामलिंग लटके, माहावीर बारसकर, सतिश भांडवलकर, शिवाजी कासारे, नाना भांडवलकर, नामदेव वायसे, तुषार पाटील, नामदेव वायसे, बंडू गोकणे, ज्योतीराम क्षीरसागर, पाडुरंग हगारे, दिपक पाटील, भारत पवार, बाळासाहेब पाटील, दिनकर ताकमोडे, रणजित अंधारे, महेश करळे, लतीफ कुरैशी, इरशाद कुरैशी, शिवाजी गरड, बाळासाहेब कदम, सुरेश पालके, जमुन मुजावर, योगेश नरसाळे, संतोष कदम, सुर्यकांत बोराडे, लक्ष्मीकांत माळी, सोमनाथ गुरव, सुजित शिंदे आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घराणेशाही टिकवण्यासाठी विरोधकांची केविलवाणी धडपड – खा. राजेनिंबाळकर



वाशी दि.९ (प्रतिनिधी) – उस्मानाबाद लोकसभा मतदार संघ महायुतीमध्ये राष्ट्रवादी कांग्रेस (आजित पवार) यांना मिळाल्याने लोकसभेची उमेदवारी पत्नीस मिळून दिली. ही सर्व केविलवाणी धडपड केवळ पाटील कुटुंबाची घराणेशाही टिकवण्यासाठी असल्याची टीका खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी विरोधकांवर केली आहे.

स्वतः भाजपमध्ये व पत्नी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असून देखील तारेवरची कसरत केवळ सत्तेच्या हव्यासापोटीआहे. मात्र जिल्ह्यातील मतदार जागृत झाला असून त्यांच्या भुलथापांना बळी न पडता त्यांना योग्य जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही नसल्याचा टोला खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी लगावला. तसेच २०१९ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत पराभरावाचा सामना करणाऱ्या पाटील कुटुंबियांनी ज्या शरदचंद्र पवार यांना मोठे केले. त्यांना सोडून कमळ हाती घेत भाजपामध्ये पक्ष प्रवेश करुन तुळजापुरची आमदारकी पदरी पाडून घेत मागील ५ वर्ष पालकमंत्री पदाची स्वप्न पाहिली. या वर्षीच्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये धाराशिव मतदार संघ महायुतीमध्ये राष्ट्रवादी कांग्रेस यांना मिळाल्याने लोकसभेचे उमेदवारी पत्नीस मिळून दिली. ही सर्व केवीलवाणी धडपड केवळ पाटील कुटुंबाची घराणेशाही टिकवण्यासाठी आहे. स्वतः भाजपमध्ये व पत्नी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असून ही तारेवरची कसरत केवळ सत्तेच्या हव्यासापोटीआहे. मात्र उस्मानाबाद जिल्ह्यातील मतदार जागृत झाला असून त्यांच्या भुलथापांना बळी न पडता यांना योग्य जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही नसल्याचे मत खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी व्यक्त केले.

मी सातत्याने धाराशिव लोकसभा मतदार संघांतर्गत सर्व शेतकऱ्यांच्या अडचणीच्या अनुषंगाने लोकसभेमध्ये प्रश्न मांडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या संदर्भाने सातत्याने पाठपुरावा केला. तसेच शेतकऱ्यांना एन.डी.आर.एफ/ एस.डी. आर. एफ. दुष्काळाचे अनुदान अतिवृष्टी अनुदान, प्रधानमंत्री पिक विमा, शेतकऱ्यांकरीता रासायनीक खतावरील सबसीडी, सोयाबीन, कांदा, द्राक्षे, ऊस दर आदी प्रश्नांसंदर्भात सातत्याने पाठपुरवा करुन आर्थीक मदत मिळून दिली आहे. याचबरोबर लोकसभेमध्ये मराठा व धनगर आरक्षण, लिंगायत धर्मास मान्यता देवून अल्पसंख्याकाचा दर्जा देणेबाबत, मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती संदर्भात लोकसभेत प्रश्न विचारुन पाठपुरवा केला. तर लोकसभेमध्ये शेतकऱ्यांच्या( पवार) संदर्भात (आयात निर्यात धोरण), कांदा निर्यात बंदी व निर्यात शुल्कत वाढ (२०२३–२४), तुरदाळ आयात संदर्भात, ऊस, द्राक्षे, टोमॅटो दर, दुध दर संदर्भात, वारंवार शेतकऱ्यांची बाजू लोकसभेमध्ये मांडून शेतकऱ्यांच्या बाजूने लोकसभेमध्ये आवाज उठवला. शेतकऱ्यांची समस्या जाणून शेतकऱ्यांसाठी काम करणारे लोकप्रतीनिधी तसेच संकटाच्या काळात माजी मुख्यमंत्री उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून ५० खोक्यांना बळी न पडता निष्ठेने त्यांच्या पाठीशी उभे राहिले म्हणून सारोळा मां ता. वाशी येथील शेतकरी शिवराज नांगरे यांनी आपल्या शेतीच्या उत्पन्नातून स्वयंस्फुर्तीने खा राजेनिबाळकर यांना १० हजार रुपयांचा चेक देवून आर्थिक मदत केली आहे. शिवराज नांगरे यांच्या कार्याचे शिवसेना कार्यकत्यांकडून कौतुक होत आहे. तसेच सलू, पिपळगाव (कोठावळे) सारोळा (मांडया), पिंपळगाव (लि), सारोळा (वाशी), सोनेगाव, दळवेवाडी, बोडकी, झिन्नर, दसमेगाव मांडवा, सोनारवाडी, बावी आदी गाव भेट दौरा करण्यात आला. यावेळी भूम परांडाचे माजी आमदार राहुल मोटे, शिवसेने जिल्हाप्रमुख रणजित ज्ञानेश्वर पाटोल, वाशी तालुकाप्रमुख विकास मोळवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिलीप घोलप, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेश शिंदे, सरचिटणीस विलास शाळू, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक काकासाहेब पाटील, उपजिल्हा प्रमुख चेतन बोराडे, माजी सभापती सुदन पाटील, वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रणजित गायकवाड, उपसभापती तात्यासाहेब गायकवाड, प्रदीप मेटे उपजिल्हाप्रमुख शिवसेना, काकासाहेब मोरे, नितिन बिक्कड, शरद पवार, रवि कारे, शाम शिंदे, नितिन शिंदे, पिंटू पाटील, दत्तात्रय भांगे, बालाजी शिंदे, व्हाईस चेअरमन बळीराम शिंदे, हनुमंत शिंदे आदींसह कार्यकर्ते व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# अधूनमधून भरतरत्न

राजरंग : राज चिंचणकर

मराठी नाट्यसृष्टीत आता एका नव्या पुरस्काराची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे. मात्र हा पुरस्कार कुणी पुरस्कृत केलेला नाही; तर खिशात दमडाही नसलेल्या एका अवलियाने हा पुरस्कार सुरू केला आहे. ज्येष्ठ रंगकर्मी व नाट्य व्यवस्थापक अशोक मुळ्ये यांनी हा पुरस्कार जन्माला घातला आहे आणि त्यांनी हा पहिला-वहिला भरतरत्न' पुरस्कार अभिनेता भरत जाधव यांना प्रदान केला आहे. पण हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येणार नसल्याची चर्चा आहे आणि ही चर्चा खरी असल्याचे संकेत साक्षात अशोक मुळ्ये यांनीच दिले आहेत. त्यामुळे या पुरस्काराची अधूनमधून देण्यात येणारा पुरस्कार' म्हणून नाट्यसृष्टीत नोंद घेतली जाणार आहे.

साधारणतः एखादा पुरस्कार देण्यास प्रारंभ होतो आणि दरवर्षी तो मान्यवरांना दिला जातो. अशोक मुळ्ये यांनीही त्यांच्या माझा पुरस्कार' सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर यंदाचा भरतरत्न' पुरस्कार हा पहिला-वहिला आहे, असे जाहीर केले होते. त्यामुळे यापुढे दरवर्षी एखाद्या रंगकर्मीला हा पुरस्कार ते देतील अशी अपेक्षा होती. मात्र तसे काही होणार नसल्याचे निदान सध्यातरी चित्र आहे. अर्थातच यावर या अवलियाशी संवाद साधल्यावर मिळालेली माहिती रंजक आहे.

यंदा भरत जाधव यांचे अस्तित्व' हे नवीन नाटक रंगभूमीवर आले आणि या नाटकात त्यांनी चक्क गंभीर स्वरूपाची भूमिका रंगवली आहे. त्यांची ही चाकोरीबाहेरची भूमिका पाहून अशोक मुळ्ये यांना त्यात विशेष' वाटले आणि या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांनी भरत जाधव यांना भरतरत्न' पुरस्कार दिला. त्यामुळे अशी विशेष कामगिरी' कुणा रंगकर्मीने केली, तर आणि तरच हा पुरस्कार अशोक मुळ्ये यांच्याकडून दिला जाणार असल्याचे स्पष्ट होत आहे. भरतरत्न' पुरस्कार स्वीकारल्यावर भरत जाधव जे म्हणाले तेही महत्त्वाचे आहे. मुळ्ये काकांनी हा पुरस्कार मला जाहीर केल्यावर लोकांनी मला भारतरत्न'च मिळाला की काय अशा पद्धतीने फोन केले. पण मी सांगू इच्छितो की मला एकवेळ भारतरत्न' नाही मिळाला तरी चालेल, पण हा भरतरत्न' पुरस्कार माझ्यासाठी खूप मोलाचा आहे, अशा शब्दांत आनंद व्यक्त केला. अशोक मुळ्ये यांना पुढेही नाट्यसृष्टीत अशी काही विशेष रत्ने' सापडली; तर त्यांना ते हा पुरस्कार नक्कीच देतील. पण आता त्यांचा हा भरतरत्न' पुरस्कार दरवर्षी सुरू राहावा; अशी कामगिरी करण्याची जबाबदारी मात्र रंगकर्मींवर आपसूकच येऊन पडली आहे.

# आरबीआयचा गौरवशाली प्रवास

अर्थसल्ला : महेश मलुष्टे, चार्टर्ड अकाऊंटंट

नुकतेच १ एप्रिल २०२४ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ९० वर्षे पूर्ण केली आहेत, त्या अनुषंगाने आजच्या लेखात मी आर.बी. आय ५ एप्रिल २०२४ रोजी जाहीर केलेल्या पतधोरणाविषयी थोडक्यात माहिती देणार आहे. यावेळचे पतधोरण सादर करताना आर.बी.आय.चे गव्हर्नर शक्तिकांता दास यांनी आर.बी.आय. या संस्थेचा ९० वर्षांच्या प्रवासाबाबत भाष्य करताना म्हटले की, आर.बी.आय. या गौरवशाली संस्थेचा प्रवासाचा आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या उत्क्रांतीचा जवळचा संबंध आहे.

या नऊ दशकांत असंख्य ऐतिहासिक घटना घडल्या आहेत, जसे की, नियोजन युग, बँकेचे राष्ट्रीयीकरण, युद्धे, दुष्काळ, ब्रेटन वूड्स प्रणालीचा पतन, तेलाचे धक्के, पेमेंट्सची अनिश्चित स्थिती आणि त्यानंतरच्या बाजारातील सुधारणा, आशियाई आणि जागतिक आर्थिक संकटे, तीव्र नाराजी आणि शेवटी कोविड-१९ महामारी आणि अलीकडच्या काही वर्षांतील भौगोलिक-राजकीय शत्रुत्व आणि या सर्वांमध्ये आर.बी.आय.ने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली आहे. यावेळीच्या पतधोरणात, पतधोरण समितीच्या सल्यानुसार रेपो दर ६.५० टक्क्यांवर अपरिवर्तित ठेवण्यात आला आहे परिणामी, स्थायी ठेव सुविधा (एस डी एफ) दर ६.२५ टक्के आणि मार्जिनल स्टँडिंग सुविधा (एम एस एफ) दर आणि बँक दर ६.७५ टक्के आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा, १९३४ मधील वित्त कायदा, २०१६ द्वारे सुधारणा करण्यात आली. ज्यामुळे वाढीचे उद्दिष्ट लक्षात घेऊन किंमत स्थिरता राखण्यासाठी, पतधोरण समितीसाठी एक वैधानिक आणि संस्थात्मक फ्रेमवर्क प्रदान करण्यात आले आहे. चलनवाढीचा दर निर्दिष्ट लक्ष्य पातळीमध्ये राखण्यासाठी आवश्यक बेंचमार्क पॉलिसी रेट (रेपो रेट) निश्चित करण्याचे काम पतधोरण समिती करत असते. आर.बी.आय.कायद्याच्या तरतुदीनुसार,पतधोरण समितीच्या सहा सदस्यांपैकी तीन सदस्य आर.बी.आय.चे असतात आणि इतर तीन सदस्यांची नियुक्ती ही




केंद्र सरकार करत असते.

रेपो दर किंवा आर.बी.आय ज्या व्याजदराने व्यावसायिक बँकांना कर्ज देते (म्हणजे एम एस एफ दर) तो दर व्यक्ती आणि व्यवसायांसाठी कर्ज घेण्याची किंमत निश्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. जेव्हा रेपो दर कमी होतो, तेव्हा बँका त्यांचे कर्ज दर कमी करतात. ज्यामुळे कर्जे स्वस्त होतात आणि वाढतो तेव्हा कर्जे महाग होतात. सदरच्या पतधोरणात रेपो दरात काही बदल केले नसल्यामुळे कर्जदारांना कोणताही दिलासा मिळणार नाही. तरलता आणि आर्थिक बाजार परिस्थितीवर भाष्य करताना सांगितले की, सरकारी खर्चात वाढ, रिझर्व्ह बँकेचे बाजारातील कामकाज आणि विक्री खरेदी स्वॅप लिलावाच्या रिटर्न-लेगच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी आणि मार्चमध्ये तरलतेची परिस्थिती कमी झाली. विशेषतः मार्चमध्ये तरलतेची स्थिती सुधारली आणि महिन्याच्या पहिल्या सहामाहीत प्रणालीतील तरलता अधूनमधून सरप्लस झाली आहे. तसेच पुढे आर्थिक स्थिरता भाष्य करताना म्हटले आहे की, डिसेंबर २०२३ अखेरपर्यंतचा नवीनतम डेटा दर्शवितो की, शेड्युल्ड कमर्शियल बँक्सचे भांडवल आणि मालमत्तेच्या गुणवत्तेचे प्रमुख निर्देशक निरोगी आहेत. नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्यांचे आर्थिक निर्देशक नवीनतम उपलब्ध आकडेवारीनुसार बँकिंग प्रणालीशी सुसंगत आहेत. बाह्य क्षेत्रावर भाष्य करताना म्हटले आहे की, २०२३-२४ च्या पहिल्या तीन तिमाहींमध्ये, भारताची चालू खात्यातील तूट लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीत भारतातील व्यापारी माल आणि सेवा निर्यात चांगली गतीने वाढली आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा रेमिटन्स प्राप्त करणारा देश आहे. रेमिटन्स प्राप्त करण्याचा खर्च हळूहळू कमी होत आहे. एकंदरीत, २०२४-२५ साठी चालू खात्यातील व्यवहार्य आणि प्रख्यातपणे व्यवस्थापित करण्यायोग्य अशा पातळीवर राहण्याची अपेक्षा आहे. सार्वभौम ग्रीन बाँड्समध्ये अनिवासींचा व्यापक सहभाग सुलभ करण्याच्या उद्देशाने, आयएफएससीमध्ये या बाँड्समध्ये गुंतवणूक आणि व्यापार करण्याची योजना लवकरच अधिसूचित केली जाईल अशी घोषणाही त्यांनी केली. कॅश डिपॉझिट मशिन्सद्वारे रोख जमा करणे हे प्रामुख्याने डेबिट कार्ड वापरून केले जाते. एटीएममध्ये यूपीआय वापरून कार्ड-लेस कॅश काढण्यापासून मिळालेला अनुभव पाहता, आता यूपीआय वापरून कॅश डिपॉझिट मशिन्समध्ये रोख रक्कम जमा करण्याची सुविधा देण्याचा प्रस्ताव आहे. बँकांमधील चलन हाताळणी प्रक्रिया अधिक कार्यक्षम करेल अशी घोषणाही ह्यावेळी करण्यात आली.

# दिल दोस्ती दुनियादारी मुळे मला ओळख मिळाली

अभिनयाच्या जोरावर स्वतःची ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरलेला अभिनेता अशी ओळख ज्याने निर्माण केली तो अभिनेता आहे पुष्कराज चिरपुटकर. पिंपरी-चिंचवडमधील आकुर्डीतील रुरसेला या कॉन्व्हेन्ट शाळेत त्याचे शिक्षण झाले. शाळेतील स्नेहसंमेलनात त्याने भाग घेतला होता. काही नाट्य शिबिरामध्ये त्याने भाग घेतला. पुढे त्याने इंजिनीअरिंग कॉलेजला प्रवेश घेतला. तिथे त्याने काही स्पर्धेसाठी नाटकात कामे केली. इंजिनीअरिंगच्या तिसऱ्या वर्षात असताना त्याने अभिनयाच्या क्षेत्रात करिअर करण्याचे ठरविले. कॉलेज पूर्ण झाल्यावर काही प्रायोगिक नाटकात त्याने कामे केली. पाच वर्षांनंतर त्याला पहिली मालिका मिळाली. त्या मालिकेचं नाव होत दिल दोस्ती दुनियादारी.'ही मालिका त्याच्या जीवनातील टर्निंग पॉइंट ठरली. त्या मालिकेतील त्याने साकारलेलं आशुतोष पात्र गाजलं. तो सतत काहीना काही खात असतो, त्याचा भाबडेपणा प्रेक्षकांना खूप आवडला. मालिका पाहिल्यानंतर काहीजण त्याला म्हणाले की, त्याचा मित्र त्याच्यासारखाच आहे. त्याला आता सगळेजण आशू' म्हणतात. त्यानंतर बाप जन्म' हा चित्रपट त्याने केला. माझ्या बायकोचा नवरा' हे नाटक सध्या सुरू आहे. या नाटकामध्ये संजय नावाची व्यक्तिरेखा त्याने साकारली आहे. तो एका कॉलेजमध्ये प्रिन्सिपॉल असतो. तो मनाने भाबडा असतो. त्याचं अनामिका नावाच्या मुलीशी लग्न झालेलं असतं; परंतु नंतर अचानक त्याचा जीवनात वादळ येतं. अनामिकाचा पहिला पती येतो, तो कसा येतो? का येतो? त्याच्यात काय गमती जमती होतात हे सारे या नाटकात पहायला मिळेल.मुसाफिरा' या चित्रपटामध्ये त्याची अमेय नावाची व्यक्तिरेखा आहे. या चित्रपटामध्ये पाच मित्रांची घटना आहे. त्या पाच मित्रांपैकी तो एक असतो. तो विनोद करतो, मित्रांना हसवतो; परंतु त्याच्या मनामध्ये काय आहे हे इतरांना कळत नाही. या चित्रपटाचे शूटिंग स्कॉटलंड येथे झाले. मुंबई डायरी' या वेब सिरीजमध्ये त्याने काम केले. चंदू चॅम्पियन' नावाचा हिंदी चित्रपट येणार आहे. त्यामध्ये देखील तो आहे. आगामी एका वेब सिरीजमध्ये तो नकारात्मक भूमिकेत आहे. विविधांगी भूमिका साकारण्याची इच्छा मनी बाळगणाऱ्या पुष्कराजला भविष्यातील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!- **युवराज अवसरमल**

# लेडीज फस्ट मग आई शेवटी का जेवते ?

प्रश्न सरळ आणि साधा आहे, आपल्या अवती भोवती असे अनेक प्रश्न आपल्याला कदाचित माहित नसतात, कदाचित ते आपल्या जवळ असूनही आपण त्या गोष्टीपर्यंत पोहचत नाहीत. पृथ्वीवरचा स्वर्ग म्हणजे आई. आईविना जीवन व्यर्थ आहे. जगातली सर्व ताकद एकीकडे व फक्त एकटी आई एकीकडे अशी ही आईची व्याख्या आहे. म्हणतात ना आकशाचा कागद आणि समुद्राची शाई जरी केली तरी आईविषयी निबंध लिहिला जाऊ शकणार नाही कारण ते सुध्दा कमी पडेल. स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी हे अगदी तंतोतंत खरं आहे. ज्याच्याजवळ आई नाही त्याला विचारा आई खरंच काय असते. आईची व्याख्या इतक्या सहज कोणीच करु शकत नाही. देवाला प्रत्येकाडं वेळ देणं होत नाही त्यामुळं त्या परमेश्वरांन आईच्या रुपात आपल्यावर माया करत आहे. आई वडीलांएवढं प्रेम जगाच्या पाठीवर कोणीच करु शकत नाही. स्त्रीमध्ये नवनिर्माण करण्याची क्षमता असते. तिच्यामध्ये असणारी सकरात्मक उर्जा परिवर्तन करण्याची हिम्मत असते. प्रत्येक स्त्री कोणाची तरी आई, बहिण, पत्नी, मुलगी असते. आईएवढं महान व्यक्तीमत्व जगात कोणीच नाही. आपल्या परिवारासाठी रक्ताचं पाणी करुन आपला परिवार सांभाळत असते ती आई असते, सकाळी लवकर उठून सर्वांना सकाळाचा प्रत्येकाच्या चवदार आवडीचा नाष्ता खायला देते ती आई असते, बापाचा फाटलेला सदरा शिऊन मुलाला ऐपत नसतांना देखील शाळेत इतर मुलं नावं ठेवतील म्हणून कर्ज काढून का होईना पण नवीन शर्ट, बुट व इतर चैनीच्या सर्व गोष्टी उपलब्ध करुन देते ती आई असते, आपल्या बापाचा मार खाते पण मुलांना रागवू देत नाही ती आई असते, मुलांनी काही खोडया केल्या तर ती गोष्ट वडीलांपर्यंत न जाऊ देत आपल्या मुलांनं काहीच केलं नाही असं बाबाला समजाऊन सांगणारी आई असते, मुलगा अगर परदेशी जातोय असं म्हटल्यावर डोळयात टचकन् पाणी येणारी पहिली आईच असते. लेकरु परगावी शिकायला आहे त्याला वेळेवर जेवण कर, तब्येतीकडं नीट लक्ष दे म्हणणारी फक्त आईच




आसते. परिक्षेमध्ये मार्क कमी पडले तर बाबा रागावतात पण डोक्यावरुन हात फिरवुन पुन्हा चांगला अभ्यास कर म्हणून आपल्या मुलांना सकारात्मक उर्जा देणारी व हिम्मत देणारी आई असते, आई हे दोन अक्षरी नाव नसून तो एक मोठा विचार आहे, आई हे एक विश्व आहे. प्रेम व त्यागाचं प्रतीक म्हणजे आई. त्याग काय असतो हा विषय जगातल्या प्रत्येकांन आईकडून शिकावा. अनेकवेळेला गरीबीच्या व हालाखिच्या परिस्थितीमध्ये असतांना पोटाची खळगी भरण्याची भ्रांत असतांना आपल्या लेकरांसाठी स्वतः आर्धी भाकरी खाऊन मुलांना पोटभर जेऊ घालणारी आई आज वृध्दाश्रमात दिसत आहे. असं दृष्य पाहिल्यावर मन खिन्न होतं. तुमच्यासाठी, संसारासाठी, तुमच्या शिक्षणासाठी, नोकरीसाठी जे काही असेल तुम्ही म्हणाता ना की मी यश मिळवलं आहे पण हे वाक्य साफ चुकीचं आहे, आई हयात असो व नसो तिच्याशिवाय तुम्ही शुन्य आहात हे लक्षात असू दया. तुम्ही मिळवलेल्या यशाच्या पाठीमागे आईच सर्वस्वी असते हे मात्र शंभर टक्के सत्य आहे.

सर्वात महत्वाचा प्रश्न, आता जागतीक पातळीवर सर्वत्र लेडीज फस्ट म्हणून डंका वाजत असतांना प्रत्येकांच्या घरी पृथ्वीवरचा स्वर्ग, सर्वांची माय माऊली सर्वात शेवटी का जेवते ? ती सर्वांबरोबर का नाही जेवत, तिला बाबा आणि मुलांसोबत जेवणाची का नाही मुभा ? हा सवाल डोक्यात ठासून भरा आणि इथून पुढं आई सर्वांसोबतच जेवली पाहिजे असा बदल आपल्या परिवारामध्ये नक्कीच करा ही कळकळीची सर्वांना विनंती आहे. असे अनेक विविध प्रश्न आपल्या सभोवतालीच असतात परंतू आपल्याला ते दिसत नाहीत हे दुर्देव आहे. यापुढे आई मुळीच सर्वांची जेवणं झाल्यानंतर जेवण करणार नाही अशी शपथ घ्या. तिला सर्व परिवारासोबत घेऊनच जेवायला बसा, बस या लेखातून एवढंच सांगायचं आहे. असं अनुकरण सर्वजण कराल हीच अपेक्षा.

- शंकर चव्हाण, (महाराष्ट्र राज्य), ९९२१०४२४२२

# यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ेळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# सार्वजनिक ग्रंथालयांनी चांगली सेवा आणि गुणवत्तेचा पॅटर्न निर्माण करावा - वंदना काटकर




**उदगीर (प्रतिनिधी)** ग्रंथालयांना शासकीय अनुदान देण्याची प्रक्रिया होत असते,तथापि केवळ शासनाच्या अनुदानावर अवलंबून न राहता,विविध उपक्रम राबवून,ई सेवा केंद्राच्या सेवा देत स्वतःचे उत्पन्न वाढवावे असे सांगून जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांनी वाचकांना दर्जेदार सेवा देत गुणवत्तेचाही पॅटर्न निर्माण करावा,असे आवाहन जिल्हा शासकीय ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी येथे केले.

लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या शासनमान्य ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग २०२४ चा शुभारंभ आणि नूतन जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांचा स्वागत सत्कार समारंभ सोमवार,दि.८एप्रिल २०२४ रोजी संघाच्या हुतात्मा स्मारक कार्यालयात आयोजित संयुक्त समारंभात उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या.समारंभाच्या अध्यक्षपदी जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे तर प्रमुख मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले,जिल्हा ग्रंथालय निरीक्षक हरिश्चंद्र डेंगळे,ज्येष्ठ संचालक हावगीराव बेरकीळे हे उपस्थित होते.

ग्रंथालयाच्या माध्यमातून वाचकांना सेवा देत देत शासनाच्या विविध योजनांची माहिती द्यावी,दैनंदिन घडामोडीची माहिती द्यावी,वाचनालयाचे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावेत,ग्रामीण स्पर्धा परीक्षार्थींना साहित्य उपलब्ध करुन द्यावे,बालवाचक वाढवावे,ग्रंथालयांना आरआर फ़ाउंडेशनच्या माध्यमातून संगणक उपलब्ध करुन देण्याचा आपला प्रयत्न राहील अशी ग्वाही देवून ग्रंथपालन वर्गाचे उद्घाटन झाल्याचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी जाहीर केले. अध्यक्षीय समारोपात प्रभाकर कापसे यांनी ग्रंथपालन वर्ग आणि जिल्ह्याच्या ग्रंथालय चळवळीची माहिती दिली.ग्रंथमित्र राम मेकले,ग्रंथपालन वर्गाचे मुख्याध्यापक अमित म्हेत्रे,शिक्षक प्राचार्य युवराज अंधोरीकर,शादुल शेख यांनी मनोगत व्यक्त केले.हावगीराव बेरकीले यांनी प्रास्ताविक केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक संतोष करमले यांनी केले. संचालक अजित पाटील यांनी आभार मानले.

प्रारंभी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.त्यानंतर नूतन जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर तसेच प्रमुख पाहुण्यांचा जिल्हा ग्रंथालय संघ,ग्रंथपालन वर्गाचे शिक्षक,सर्व तालुक्याचे प्रतिनिधी, महिला आणि विविध ग्रंथालयांच्यावतीने शाल,पुष्पहार,ग्रंथ भेट देवून स्वागत केले.वर्गशिक्षक डॉ. धनंजय घटकार,वैशाली दुरुगकर,शारदा कनामे,युवराज अंधोरीकर यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी जिल्हा ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष राम मोतीपवळे, सहसचिव काशिनाथ बोडके, श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुपोषपाणी आर्य, सहसचिव सौ. अंजुमनी आर्य, सूर्यकांत शिरसे, गुप्तलिंग स्वामी, किरण बाबळसूरे, बाळकृष्ण होळीकर, नंदकुमार घोगरे,गिरीधर जंगाले, सुशील मेकले, विठ्ठल कटके, सूर्यकांत जाधव आदिंनी सहकार्य केले.या कार्यक्रमाला ग्रंथालय कर्मचारी, ग्रंथालय चालक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते,राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २८०/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Dhanaji Nagnath Gunale हे दिनांक २७.१०.२०२२ रोजी Tiruka Tq. Jalkot Dist.Latur व Ujwala Dhanaji Gunale ही दिनांक १५/०९/२०१९ रोजी Gudsur Tq.Udgir Dist.latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

Nagesh Dhanaji Gunale, Age 18 Occu. Education

Applicant R/o. Gudsur Tq.Udgir Dist.latur

यांनी खालील नमूद एकमेव व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Nagesh Dhanaji Gunale | 18 | Son |

अर्जदार याने Dhanaji Nagnath Gunale व Ujwala Dhanaji Gunale या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Dhanaji Nagnath Gunale व Ujwala Dhanaji Gunale यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः ०६/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः ०७/०५/२०२४

आदेशावरुन

(ए.बी.सुर्यवंशी) कनिष्ठ लिपिक, सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## IN THE COURT OF SENIOR CIVIL JUDGE AT HUMNABAD

MC.No.07/2023

Petitioner : Jaisho Kumar

Vs

Respondent : Priyanka

Sub:- Petition u/s 13(1) (IA) and (iB) for Hindu marriage Act.

TO,

Priyanka W/o Jaisho Kumar Moghe, Aged about 31 years, Occ: Household, R/o Nalwad, Tq. Nilanga Dist. Latur and Sultanabadwadi village Tq. Humnabad Dist. Bidar.

Whereas, the petitioner has filed the above mentioned matrimonial case against the respondent and the petitioner has taken court process and also by registered post acknowledgment due on the address mentioned above and you the respondent wilfully and deliberately and intentionally avoiding to honour the process of the court as such court has ordered to issue substituted service by newspaper against you.

Therefore you the respondent is directed to appear before this court on 19-04-2024 at about 11:00 AM in person or by authorized agent/Advocate and in default the matrimonial case will be heard and decided in your absence.

Given under my hand and the seal of the court, on 05th day of April-2024.

//By order of the Court//
Sunita H.(C.M.O)
Senior Civil Judge & MFC Court
Humnabad

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २८२/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Machindra S/o. Kishanrao More हे R/o. Bhakaskheda Tq.Udgir Dist.Latur दिनांक ०४/०९/२००२ रोजी At. Bhakaskheda Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Kamal W/o. Machindra More, Age 55, Occu- H.H.

2) Mahesh S/o. Machindra More, Age 30 Occu- Business & Agri.

Both R/o. Bhakaskheda Tq.Udgir Dist.latur

यांनी खालील नमूद २ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Kamal W/o. Machindra More | 55 | Wife |
| 2) | Mahesh S/o. Machindra More | 30 | Son |

अर्जदार याने Machindra S/o. Kishanrao More या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Machindra S/o. Kishanrao Moreयानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः ०६/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १०/०५/२०२४

आदेशावरुन

(के.डी.सुर्यवंशी) कनिष्ठ लिपिक, २ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर




## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २८५/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी अर्जदार यांचे आई नामे Vishwanath S/o. Sidramappa Chalava हे दिनांक १४/१२/२०२० रोजी Udgir Tq.Udgir Tq.Latur येथे मयत झाले आहेत.

Ajay S/o. Vishwanath Chalva,

Age 60 yrs, Occu. Agri & Business

R/o. Udgir Tq.Udgir Dist.latur

यांनी खालील नमुद ६ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Ajay S/o. Vishwanath Chalava | 60 | Son |
| 2) | Anita W/o Chandrakant Mule | 58 | Daughter |
| 3) | Mahadev S/o. Vishwanath Chalava | 56 | Son |
| 4) | Kavita W/o. Manik Metage | 56 | Daughter |
| 5) | Rajkumar S/o. Vishwanath Chalava | 51 | Son |
| 6) | Vilas S/o. Vishwanath Chalava | 46 | Son |

अर्जदार याने Vishwanath S/o. Sidramappa Chalava या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Vishwanath S/o. Sidramappa Chalava e यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०८/०५/२०२४ आदेशावरुन

(संतोष डी. शिंदे) कनिष्ठ लिपिक, सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २७७/२०२४ निशाणी क्रमांक ०६

ज्याअर्थी नामे Dattatri Dombale हे दिनांक ११/०१/२०२३ रोजी Bhavani Bijalgaon Tq.Kamalnagar Tq.Bidar येथे मयत झाले आहेत.

1) Piraji s/o. Dattatrya Dombale,

Age 31 yrs, Occu. Agri,

2) Chandarbai W/o. Dattatrya Dombale,

Age 57 yrs, Occu. H.H.,

Both R/o. Mu. Kaulkhed Po. Udgir Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमुद १ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Piraji S/o Dattatrya Dombale | 31 | Son |
| 2) | Chandrabai W/o. Dattatraya Dombale | 57 | Wife |

अर्जदार याने Dattatri Dombale या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Dattatri Dombale यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०९/०५/२०२४ आदेशावरुन

(संतोष डी. शिंदे) कनिष्ठ लिपिक, सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २८९/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Govindrao S/o. Mukundrao Sonkamble हे दिनांक ०२/१०/२०२३ रोजी Hali Tq.Udgir Tq.Latur येथे मयत झाले आहेत.

Dayanand S/o Govindrao Kamble,

Age 57 yrs, Occu. Labour

R/o. Hali Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमुद ६ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Dropadi W/o Govindrao Kamble | 83 | Wife |
| 2) | Dhanraj S/o. Govidnrao Sonkamble | 63 | Son |
| 3) | Dayanand S/o. Govindrao Kamble | 57 | Son |
| 4) | Raja S/o. Govindrao Athawale | 56 | Son |
| 5) | Talware Vidhya W/o. Gangadhar | 53 | Daughter |
| 6) | Rama W/o Bharat Kamble | 49 | Daughter |

अर्जदार याने Govindrao S/o. Mukundrao Sonkamble या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Govindrao S/o. Mukundrao Sonkamble यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

(संतोष डी. शिंदे) कनिष्ठ लिपिक, सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २७४/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Kondiba Malu Waghamare हे R/o. Ravankola Tq.Jalkot Dist.Latur दिनांक १६/०४/२०२१ रोजी At. Ravankola Tq.Jalkot Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Lalitabai W/o. Sanjay Totre, Age 42,

2) Vandana W/o. Khandu Totre, Age 34,

3) Satvaji S/o. Kondiba Waghmare, Age 38, Occu.Agi

R/o. Ravankola Tq.Jalkot Dist.Latur

4) Maroti S/o. Kondiba Waghamare, Age 36,

5) Sangubai W/o. Kondiba Waghmare, Age 60

यांनी खालील नमूद ५ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Lalitabai W/o. Sanjay Totre | 42 | Daughter |
| 2) | Vandana W/o. Khandu Totre | 34 | Daughter |
| 3) | Satvaji S/o. Kondiba Waghmare | 38 | Son |
| 4) | Maroti S/o. Kondiba Waghamare | 36 | Son |
| 5) | Sangubai W/o. Kondiba Waghmare | 60 | Wife |

अर्जदार याने Kondiba Malu Waghamare या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Kondiba Malu Waghamare यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः ०५/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १०/०५/२०२४

आदेशावरुन

(के.डी.सुर्यवंशी) कनिष्ठ लिपिक, २ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## दैनिक यशवंत विभागीय कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !





उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# एकतेसाठी धावले हजारो लातूरकर

## भीम फेस्टिवल अंतर्गत फ्री व्हॉइस ग्रुपचा उपक्रम



लातूर / एक धाव लातूरकरांसाठी हे घोषवाक्य घेऊन फ्री व्हॉइस ग्रुप लातूरच्या वतीने आयोजित भीम फेस्टिवलचा एक भाग म्हणून मंगळवारी पहाटेच्या वेळी आयोजित मॅरेथॉनमध्ये हजारो लातूरकर धावले. यामध्ये जेष्ठ नागरिक, महिला, युवक युवतीनी मोठया संख्येने सहभाग घेतल्याचे दिसून आले.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचार, कार्यांना अभिप्रेत उपक्रम घेऊन अभिवादन करण्यात यावे. यात लातूर शहर तसेच परिसरातील लहान थोर, महिला,युवक या आंबेडकरी अनुयायांना सहभागी करण्याचा फ्री व्हॉइस ग्रुपचा मानस असून मागील तीन वर्षांपासून शहरात ग्रुपच्या वतीने हा फेस्टिवल मोठया उत्साहात साजरा केला जात आहे. याचाच एक भाग म्हणून मंगळवारी पहाटे सहा वाजता आंबेडकर चौक ते आंबेडकर पार्क या दरम्यान एकता दौड घेण्यात आली यामध्ये शहरासह परिसरातील जेष्ठ नागरिक, महिला, युवक, युवतीसह लहान मुले मोठया संख्येने सहभागी झाले होते.स्पर्धेत रोहित सावंत प्रथम, द्वितीय रविंद्र चव्हाण, ओम उपरवाड तिसरा, महिला गट अंजली चौधरी, सोनी आडे, आरती पेठे, लहान गट विश्र्वराज आवटे, सरकार आचार्य, श्रावस्ती बनसोडे हे विजेते ठरले, सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक पारितोषिक देण्यात येणार आहे. वयोवृद्ध असतानाही तरुणांसोबत दौडमध्ये हिरीरीने सहभागी होणारे कोमल गायकवाड, वनिता आचार्य यांचाही विशेष सन्मान केला जाणार आहे. रॅलीस भन्ते पय्यानंद थेरो यांनी निळा झेंडा दाखवला, यावेळी फ्री व्हॉईस ग्रुपचे डॉ. विजय अजनीकर, मा. ना.गायकवाड, प्रा.हर्षवर्धन कोल्हापुरे,अड राजकुमार गंडले, प्रा. कटारे दुष्यंत , संघपाल शिंदे, पांडुरंग वाघमारे, शैलेंद्र गाडे, डॉ कारेपूरकर, जितेंद्र सुर्यवंशी, डॉ घाटे, मयूर बनसोडे. समता सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभेचे प्रा. बापू गायकवाड, मेजर राजाराम साबळे,सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष जितेंद्र बनसोडे, राहुल कांबळे, सुजाता अजनीकर , मंजुषा निंबाळकर, सुशील चिकटे, आशा चिकटे,बालाजी सावंत, सुशेन सातपुते, अड रोहित सोमवंशी, अरुण कांबळे, सचिन गायकवाड आदींची उपस्थिती होती.

# काजळा येथे अखंड हरिनाम

## सप्ताहास मंगलमय सोहळ्यात प्रारंभ

धाराशिव (प्रतिनिधी) - तालुक्यातील येथील सुप्रसिद्ध श्री सद्गगुरु रामानंद महाराज देवस्थान समिती व काजळा ग्रामस्थांच्या वतीने गुढीपाडवा व मराठी नववर्षानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्र्वरी पारायण ज्ञानयज्ञ सोहळ्यास विधिवत मंगलमय वातावरणात मोठ्या उत्साहात शुभारंभ दि.९ एप्रिल रोजी करण्यात आला.

काजळा येथील सद्गुरु श्री रामानंद महाराज मठाच्या प्रांगणामध्ये या सोहळ्यास गुढीपाडवा व नववर्षदिनी शुभारंभ करण्यात आला. सप्ताह सोहळ्यातील मंचावर कलश व श्री सद्गुरू रामानंद महाराज, श्री दत्तगुरु महाराज, श्री विठ्ठल - रुक्मिणी, श्री ज्ञानेश्र्वर माऊली ,श्री तुकोबाराया या देव- देवतांच्या मूर्ती तसेच ध्वज ,टाळ ,मृदंग, गोमाता पूजनाने या सोहळ्यास मंगलमय वातावरणात प्रारंभ करण्यात आला. यावेळी श्री सद्गुरू रामानंद महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष प्रदीप शेळके, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष धनंजय रणदिवे, सरपंच प्रवीण पाटील, उपसरपंच जिजाबाई मडके,



विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन राजुळ पवार, उद्योजक किशोर पाटील, हभप राम पांचाळ महाराज, हभप आकाश महाराज, माजी सरपंच पांडुरंग खोचरे, शिवाजी हाजगुडे,शालेय समिती अध्यक्ष वैभव हाजगुडे, भारत सुरवसे ,व्यंकट पवार, राजाभाऊ मडके ,माजी पंचायत समिती सदस्य आश्रुबा माळी, सुधीर क्षीरसागर,सौ. सुरेखा शेंडगे, सौ. केवळ देशमुख, विष्णुदास आहेर, रामेश्वर हाजगुडे, गोविंद पवार, चंद्रकांत मडके, प्रभाकर आहेर ,माजी चेअरमन देवेंद्र मडके, बालाजी नाईकल, किशोर मसे, रामेश्र्वर पाटील, हरिश्चंद्र भोसले ,रामचंद्र पाटील, विलास बचाटे ,अरुण शेळके ,रामचंद्र कदम, ,तानाजी करंडे ,संतोष पवार ,सोमनाथ पवार, सूर्यकांत सुतार, मनोज कदम ,उत्तम हाजगुडे,जगन्नाथ क्षीरसागर, चंद्रकांत लोमटे, चंद्रकांत इंगळे, सूर्यकांत पवार, भागवत ठोंबरे ,दत्ता जावळे आदी उपस्थित होते. सप्ताह सोहळ्यात १७ एप्रिलपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. सोहळ्याचे हे ४८ वे वर्षे आहे. मंगळवारी सायंकाळी हभप नितीन महाराज जगताप ( हिप्परगा) यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. बुधवारी (दि.१०) हभप किरण महाराज ताकमोगे यांची कीर्तन सेवा होणार आहे. या सर्व धार्मिक सोहळयाचा लाभ भाविक -भक्तांनी घ्यावा असे आवाहन मंदिर संस्थानचे अध्यक्ष प्रदीप शेळके व काजळा ग्रामस्थांनी केले आहे. या सोहळयाचे सूत्रसंचालन विकास राऊत यांनी केले.

पान १ वरून

### ठाकरे गटाला...

जागावाटपाची घोषणा केली.

शिवसेनेने आधीच आपल्या २१ उमेदवारांची घोषणा केली होती तर राष्ट्रवादीनेही जवळपास सर्व उमेदवार जाहीर केले होते. सांगली व भिवंडीचे उमेदवारही त्यांनी अंतिम जागावाटप होण्यापूर्वीच जाहीर करून प्रचार सुरू केला होता. काँग्रेसने या जागा मिळवण्यासाठी प्रयत्न केला; पण त्याला या दोन्ही पक्षांनी दाद दिली नाही. यामुळे आघाडी टिकवण्यासाठी अखेर काँग्रेसलाच नमते घ्यावे लागले.

जागा सोडल्याचे दुःख, आदेशाचे केले पालन

या पत्रकार परिषदेत बोलताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी, काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे. हुकूमशाहीविरोधात आम्ही एकत्र आलो आहोत. मोठे मन करून आम्ही जागावाटप अंतिम केले असून आघाडीतील सर्व पक्षांचे कार्यकर्ते एकत्रितपणे काम करून आघाडीचे उमेदवार निवडून आणतील, असा विश्र्वास व्यक्त केला. पत्रकार परिषदेनंतर पत्रकारांशी बोलताना पटोले यांनी सांगली व भिवंडीची जागा सोडावी लागल्याचे दुःख मलाही आहे; पण माझ्यासह सर्वांना हायकमांडच्या आदेशाचे पालन करावेच लागेल, असे स्पष्ट केले.

मुंबईतील २ जागा काँग्रेसला

मुंबईतील ६ पैकी ४ जागा ठाकरेंची शिवसेना लढवणार असून काँग्रेसला उत्तर मुंबई व उत्तर मध्य मुंबई या पडीक जागा सोडण्यात आल्याने मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड नाराज असून त्या आजच्या पत्रकार परिषदेलाही उपस्थित नव्हत्या.

भाजपा हा भेकड आणि भाकड पक्ष

तत्पूर्वी संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी, भाजपा हा भेकड पक्ष आहे. विरोधकांवर सत्तेचा दुरूपयोग करून धाडी घालून, कारवाया करून पक्ष वाढविणारा पक्ष भेकडच असतो, अशा शब्दांत भाजपवर हल्ला चढविला.

शिवसेना (उद्धव ठाकरे गट) २१ जागा

जळगाव, परभणी, नाशिक, कल्याण, ठाणे, रायगड, मावळ, धाराशिव, रत्नागिरी, बुलढाणा, हातकणंगले, संभाजीनगर, शिर्डी, सांगली, हिंगोली, यवतमाळ-वाशिम, दक्षिण मध्य मुंबई, उत्तर-पश्र्चिम मुंबई, दक्षिण मुंबई, ईशान्य मुंबई.

काँग्रेस १७ जागा

नंदूरबार, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, नांदेड, जालना, मुंबई उत्तर मध्य, पुणे, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, रामटेक, उत्तर मुंबई.

राष्ट्रवादी काँग्रेस १० जागा -

बारामती, शिरूर, सातारा, भिवंडी, दिंडोरी, माढा, रावेर, वर्धा, अहमदनगर दक्षिण, बीड.

### ईडीच्या...

निवडणुकांमुळे अटकेला आव्हान दिलं जाऊ शकत नाही

दरम्यान, निवडणूका डोळ्यासमोर ठेवून केजरीवालांना अटक करण्यात आली असं याचिकाकर्त्यांनी म्हटलं, त्यावरही कोर्टाने फटकारलं. निवडणुका असल्यामुळे अटकेला आव्हान दिलं जाऊ शकत नाही. अटकेची वेळ तपास यंत्रणा ठरवतात असं कोर्टाने सांगितले.

### नरेंद्र...

तयारीला लागण्याचे आदेश दिले आहेत त्यांच्या या भुमिकेमुळे विधानसभा निवडणुकांमध्ये अधिक रंगत येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

त्याआधी राज ठाकरे यांनी अमित शाहांची भेट घेतली. ही राजकीय भेट असल्याचं सांगण्यात येत होतं. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये निवडणुकीबाबत चर्चा झाली. या चर्चेदरम्यान, तुम्ही आमच्या चिन्हावर निवडणूक लढवा, असं सांगण्यात आलं होतं. मात्र, माझ्या पक्षाचं चिन्ह रेल्वे इंजिन असून ते कार्यत्यांनी कमावलेलं आहे, ते आयात केलेलं नाही. चिन्हाबाबत तडजोड होऊ शकत नाही, असं राज ठाकरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं आहे. जागावाटपावर चर्चा झाली पण १९९५ साली मी शेवटच्या जागावाटपाच्या चर्चेवर बसलो होते त्यानंतर कधीच बसलो नाही. तू दोन घे.. तीन घे.. मला ही दे.. असं मला जमत नसल्याचंही राज ठाकरेंनी थेट सांगून टाकले.

शिवसेनेचा नाही तर मी मनसेचाच अध्यक्ष राहणार

मी कोणत्याही शिवसेनेचा नाही तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचाच अध्यक्ष राहणार असल्याचे मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ठासून सांगितले. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर राज ठाकरे यांच्या भूमिकेबद्दल अनेक अफवांना ऊत आला होता. राज ठाकरे हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे अध्यक्ष होणार असल्याचे बोलले जात होते. त्यावर बोलताना राज ठाकरेंनी आपली स्पष्ट भूमिका मांडली.

राज ठाकरे म्हणाले, मी दिल्लीत अमित शाहांच्या भेटीला गेलो, तेव्हापासूनच चक्र सुरु झालं. मी दिल्लीला शाहांच्या भेटीला गेलो हे विरोधकांना कसं कळलं? मला तिथं थांबण्याची वेळ आली नाही तर माझी भेट ही दुसऱ्या दिवशी होती, मी आदल्या दिवशीच दिल्लीत पोहोचलो होतो.

माध्यमांमध्ये त्यांच्या मनाप्रमाणे बातम्या चालवण्याचं काम सुरु असतं. दिल्लीतही पत्रकारांना सांगितलं की मला निवडणूक लढवायची असेल तर मी सांगूनच लढवणार आहे. मला जर शिवसेनेचा अध्यक्ष व्हायचं असतं तर तेव्हाच झालो नसतो का? मी बाळासाहेबांशिवाय कोणाच्याही हाताखाली काम करणार नाही. मी जन्माला घातलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचाच अध्यक्ष राहणार असल्याचं राज ठाकरे यांनी सांगितले.

### लोकसभा...

मतदारसंघांत ६ एप्रिलपर्यंत ८५ वर्षे वयावरील १० हजार ६७२ ज्येष्ठ नागरिकांचे, तर ४० टक्के दिव्यांगत्व असलेले ३ हजार ५५५ दिव्यांग मतदारांचे त्याचप्रमाणे अत्यावशक सेवा या श्रेणीत ३८५ असे एकूण १४ हजार ६१२ अर्ज गृह मतदानासाठी अर्ज प्राप्त झाले आहेत.

राज्यभरात ३९८.२० कोटींची जप्ती

राज्यामध्ये केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इ. बाबीची जप्ती करण्यात आली. यामध्ये ३८ कोटीची रोख रक्कम, २४.२६ कोटीची ३० लाख २ हजार ७८१ लिटर दारू, २०७.४५ कोटीचे १० लाख ५३ हजार ५४५ ग्रॅम ड्रग्ज, ५५.१० कोटीचे २ लाख ७५ हजार ८३१ ग्रॅम मौल्यवान धातू, ४२ लाखांचे ४ हजार २७२ फ्रिबीज, ७२.८५ कोटीचे इतर साहित्य असे एकूण ३९८.२० कोटीची जप्ती करण्यात आली आहे.

जप्त करण्यात आलेली शस्त्रे १९५, परवाने रद्द करून जप्त करण्यात आलेली शस्त्रे ७२१, परवाना जमा करण्यापासून सूट देण्यात आलेली शस्त्रे १४,७९२, तर राज्यात आचारसंहिता लागू झाल्यापासून सीआरपीसी कायद्यांतर्गत ५२ हजार ६५७ इसमांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

उमेदवारांना डमी मतपत्रिका वापरण्याची मुभा

उमेदवाराने त्याचे नाव व चिन्ह मतपत्रिकेत कोणत्या जागी येईल ही माहिती असलेल्या डमी मतपत्रिका छापून घेतल्यास, त्याला हरकत असणार नाही. मात्र, अशा डमी मतपत्रिकेवर अन्य उमेदवारांची नावे किंवा चिन्हे असता कामा नयेत. अशी डमी मतपत्रिका, खऱ्या मतपत्रिकेचा रंग तसेच आकार याच्याशी मिळती-जुळती असता कामा नये. तसेच, मतदारांच्या माहितीकरिता उमेदवार किंवा राजकीय पक्ष डमी बॅलेट युनिट तयार करू शकतात, असे डमी बॅलेट युनिट लाकूड, प्लास्टिक किंवा प्लाय बोर्ड बॉक्सचे असू शकतात. याबाबत सविस्तर तरतुदी उमेदवारांच्या हस्तपुस्तिकेत नमूद करण्यात आलेल्या आहेत, असेही चोक्कलिंगम यांनी यावेळी सांगितले.

लोकसभा निवडणुकीचा तिसरा टप्पा

तिसऱ्या टप्प्यात कोकण विभागातील २ आणि पुणे विभागातील ७ व औरंगाबाद विभागातील २ अशा एकूण ११ लोकसभा मतदारसंघामध्ये दिनांक ७ मे २०२४ रोजी मतदान घेण्यात येणार आहे.

यामध्ये १२ एप्रिल रोजी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होणार असून १९ एपिल रोजी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम मुदत आहे. नामनिर्देशन पत्र छाननी दि. २० एप्रिल रोजी होईल तर २२ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील.

### सोन्याच्या...

स्थितीमुळे सोन्याच्या दरात वाढ होतेय. ही वाढ कायम राहण्याची शक्यता आहे. येत्या काही दिवसात अक्षय तृतीया येणार आहे. या काळातही सोन्याच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. दरम्यान, दुसरीकडे चीन मोठ्या प्रमाणात सोन्याची खरेदी करत आहे. यामुळे देखील सोन्याच्या दरात वाढ होतेय.

### लोकसभा...

उमेदवारांच्या संपत्तीची कोटीच्या कोटी उड्डाणे

एआयएडीएमके उमेदवारांची सर्वाधिक सरासरी मालमत्ता ३५.६१ कोटी आहे. त्यानंतर डीएमके ३१.२२ कोटी, काँग्रेसची २७.७९ कोटी आणि भाजपची २२.३७ कोटी आहे.

यामध्ये सर्वात श्रीमंत उमेदवार छिंदवाडा येथील काँग्रेसचे नकुल नाथ आहेत. त्यांची एकूण संपत्ती ७१६.९४ कोटी आहे. त्यांच्या खालोखाल एआयएडीएमकेचे अशोक कुमार ६६२.४६ कोटींच्या मालमत्तेसह इरोडमधून निवडणूक लढवत आहेत. तर शिवगंगामधून निवडणूक लढवणारे भाजपचे देवनाथन यादव टी ३०४.९२ कोटींचे मालक आहेत.

### लोकसभा...

अनिल भिसे, रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, महेंद्र गोडभरले, अभिषेक अकनगिरे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

लोकसभेची निवडणूक ही राष्ट्रीय प्रश्नासाठी अत्यंत महत्त्वाची आहे स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच गेल्या दहा वर्षात नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने अनेक ऐतिहासिक आणि धाडसी निर्णय घेतले विकास कामात देशाला उंचीवर घेऊन गेले असल्याचे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की देशातील गोरगरीब सर्वसामान्य माणसांना दिलासा देणाऱ्या अनेक योजना सुरू केल्या या सर्व योजनांचा गरजू आणि गरिब लाभार्थ्यांना थेट लाभ मिळाला. जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता असलेल्या यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना भक्कम समर्थन मिळवून देणे ही तुमची आमची जबाबदारी आहे.

केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या माध्यमातून गावागावात मोठ्या प्रमाणात विविध विकास कामांना निधी मिळवून दिला असून केलेल्या विकास कामाच्या जोरावर लातूर लोकसभा निवडणुकीत भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना लातूर ग्रामीण मतदार संघातून मोठे मताधिक्य मिळावे याकरिता प्रत्येक कार्यकर्त्यांनी जिद्दीने जोमाने कामाला लागावे प्रत्येक बुथवर भाजपाच्या मतदानाची टक्केवारी कशा पद्धतीने वाढेल यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन आ. रमेशअप्पा कराड यांनी केले त्याचबरोबर आपसातील मतभेद बाजूला सारून निवडणूक प्रचार यंत्रणा प्रभावीपणे राबवून शासनाच्या लाभार्थ्यांबरोबरच सर्व प्रकारच्या मतदारापर्यंत पोहोचावे याबाबतच्या अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

या बैठकीत बोलताना नरेंद्र काळे यांनी बूथ कामाचा आढावा घेऊन प्रत्येक बुथवर ५१ % भाजपला मतदान झालेच पाहिजे अशी सूचना केली व लोकसभा निवडणुकीत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून भाजपा उमेदवाराला सर्वाधिक मताधिक्य राहील अशी अपेक्षा व्यक्त केली तर अर्चना पाटील चाकूरकर यांनी निवडणूक काळात काय बोलावे काय बोलू नये याबाबत कार्यकर्त्यांनी कटाक्ष पाळावे अशी सूचना करून देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी तिसऱ्यांदा झाले पाहिजेत हेच ध्येय आणि हा एकच उद्देश आपल्या सर्वांचा असल्याने आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वातील लातूर ग्रामीण मधील भाजपाचे लढवय्या कार्यकर्ते जिद्दीने जोमाने काम करून मताधिक्य मिळवतील यात शंका नाही असे बोलून दाखवले.

प्रारंभी रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले या बैठकीस लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, सुपर वॉरियर्स, शक्ती केंद्रप्रमुख यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

### काँग्रेस भवनावर...

• देशामध्ये सामान्य माणसावर अन्याय सुरू आहे, शेतकऱ्याच्या शेतीमालाला भाव नाही बेरोजगारांना नोकऱ्या मिळत नाहीत, महाराष्ट्राची अस्मिता गौरव परंपरा उज्वल राखण्यासाठी सत्ताधाऱ्यांचा राजकीय बाजार उध्वस्त करा असे प्रतिपादन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.

यावेळी लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे लातूर जिल्हाअध्यक्ष संजय शेटे, लातूर शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार, मदन काळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर महानगर प्रमुख सुनील बसपुरे, लातूर शहर प्रमुख विष्णू साठे, शेतकरी कामगार पक्षाचे उदय गवारे, अभय साळुंके, लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे निरीक्षक सर्जेराव मोरे, अशोक गोविंदपुरकर, एकनाथ पाटील, आदीसह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष,शेतकरी कामगार पक्ष विविध पदाधिकारी महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान अबाधित राखायचे आहे, या गुढीपाडव्यानिमित्त आपण संकल्प करूया देशात इंडिया आघाडीचे व राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आणू लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ.शिवाजी काळगे यांना प्रचंड मताधिक्याने विजय करावे, पेटती मशाल हातात घेऊन वाजवूया विजयाची तुतारी असे सांगून त्यांनी सर्वांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे लातूर जिल्हाअध्यक्ष संजय शेटे, लातूर शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर महानगर प्रमुख सुनील बसपुरे शेतकरी कामगार पक्षाचे उदय गवारे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

**CHANGE OF NAME DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGEING MY NAME WHICH WAS EARLIER : FAROOQUEI MOHD SHOEAB QAMER MOHD SHAFIODDIN TO :SHOEAB QAMAR MOHMMAD SHAFIOUDDIN FAROOQUEI HENCE FOR THIS DECLARATION I WILL BEKNOWNBYTHISNAMEANDWILLUSESHOEABQAMAR MOHMMAD SHAFIOUDDIN FAROOQUEI IN FUTURE THESAMENAMEWILLBEUSEDBYMYFAMILYWIFE/ CHILDRENAND RELATIVE

**OLD NAME**

FAROOQUEIMOHDSHOEABQAMERMOHDSHAFIODDIN

**NEWNAME**

SHOEAB QAMAR MOHMMAD SHAFIOUDDIN FAROOQUEI

**ADDRESS**

RAJ MOHAMMED DARGA ROAD DGIR DIST.LATURM/S

# माजी नगराध्यक्षा पुष्पाताई पाटोदेकर यांचे निधन

धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) - येथील नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्ष पुष्पाताई चंद्रहार पाटोदेकर (वय - ८७ वर्षे) यांचे दि.७ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले.



पुष्पाताई पाटोदेकर यांनी धाराशिव नगर परिषदेच्या नगराध्यक्षा, भारत स्काऊट गाईडच्या जिल्हाध्यक्ष, महिला मंडळाच्या अध्यक्षा आदी विविध पदे भूषविलेले आहेत. तसेच त्यांचे सामाजिक व राजकीय क्षेत्रात मोठे योगदान राहिले आहे. त्यांच्या पार्थिवावर रात्री १० वाजण्याच्या सुमारास शहरातील कपिलधारा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक व सर्व क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्या राज्याचे माजी गृहमंत्री व माजी खासदार डॉ पद्मसिंह पाटील यांच्या मोठ्या बहिण होत्या. त्यांच्या पश्र्चात राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष अमोल पाटोदेकर, दोन मुली, जावई, सून व नातवंडे असा मोठा परिवार आहे.


**सुर्य कल्याण मुंबई रात्र**

स्पेशल ४५/७८

| ५ | ८ | ९ |
|---|---|---|
| १४० | ३७८ | ४५० |
| ५२-५७ | ८०-८५ | ९१-९६ |

**प्रो. दिपक कुमार**

स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.

१००% चान्स पास होणार

**गोल्डन विकली चान्सेस**

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३९० | ६ | २४० | ० | १४५ |
| | ४८० | | २६८ | | २३५ |
| | २२८ | | ३३० | | ५५० |
| | ९२-२१ | ३६-६७ | | ८०-०४ | |

कल्याण(उदय/अस्त)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १३९ | १ | १४६ | ८ | १२५ |
| | २३८ | | ४७० | | २६० |
| | ६७० | | १०० | | ४४० |
| | ९३-३२ | ०१-१४ | | ७८-८६ | |

ता.२५ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी

संपर्क करा

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.

मोबा-९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

गोल्डन विक्री चान्सेस

मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

दिवाळी बंपर चालू आहे

99 75 47 98 26

दुकान भाडयाने देणे आहे

शिवाजी चौक देगलूर रोड उदगीर

१८ x ६५ ची ३ मजली ईमारत भाडयाने देणे आहे.

संपर्क
शिवशंकर नागठाणे
मो.नं. ९८९०७१८५०५
मो.नं. ८३८०८३५५७५
मो.नं. ८६००१८६५५८





# यशवंत

बुधवार दिनांक १० एप्रिल २०२४

पान ८

उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३१९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# गुडी पाडवा नववर्षानिमित्त १ लाख भाविकांनी घेतले उदागिरीबाबाचे दर्शन

























**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीरचे आराध्या दैवत उदागिरी बाबा महाराज समाधी उदागिरी किल्लात गुडीपाडवा व नववर्षानिमित्त उदगीर शहर व परिसरातील १ लाख भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

उदगीरच्या ऐतिहासिक किल्ल्यात असलेला उदगीरचे आराध्य दैवत उदागिरी बाबा महाराज यांची सजीवन समाधी स्थळी उदागिरी बाबा महाराज उत्सव सोमवार दि. ०१ एप्रिल २०२४ पासून हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, किर्तन तसेच दररोज महारुद्रअभिषेक आदि विविध धार्मिक कार्यक्रमाने प्रारंभ झाला.सोमवार वार दि. ०८ एप्रिल रोजी हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाची सांगता झाली. ०८ एप्रिल २०२४ रात्री १२ वाजता उदागिर बाबा महाराज मठ संस्थानचे मठाधिश जयशगिर गुरु सतिशगिर महाराज यांच्या हस्ते महारुद्र अभिषेक संपन्न होवून नववर्ष गुडीपाडव्यानिमित्त दर्शनास प्रारंभ झाला. रात्री १२ वाजता सुरु झालेली दर्शनाची रांग रात्री १२ वाजता समाप्त झाली.

उदयगिरी बाबा महोत्सवानिमित्त आयोजित रक्तदान शिबीराचे उद्घाटन तहसिलदार राम बोरगावकर यांच्या हस्ते सद्गुरु उदागिर बाबाच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. तहसिलदार राम बोरगावकर यांनी रक्त स्वतः रक्तदान करुन रक्तदान शिबीराचे उद्घाटन केले. तर यावेळी उदगीर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक करण सोनकवडे यांनी रक्तदान करुन नवयुवकांना रक्तदानाचे आवाहन केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कै. नागप्पा अंबरखाने ब्लड बँकेचे डॉ. बस्वराज शेटकार, दैनिक यशवंतचे उदगीर विभागीय प्रतिनिधी राम मोतीपवळे,उदयगिरी अर्बन क्रेडिट सोसायटीचे सचिव दिगंबर बिरादार, तलाठी शंकर जाधव, रोहित मोतीपवळे, बाबासाहेब कांबळे, शिवलिंग कडोळे उपस्थित होते. याप्रसंगी मठाधिश जयशगिर गुरु सतिशगिर महाराज यांच्या हस्ते रक्त पेढीचे कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. या रक्तदान शिबीरात एकुण ४१ रक्तदात्यांनी रक्तदान करुन रक्तदानाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात सहभाग नोंदविला. उदागिरी बाबा उत्सवानिमित्त सकाळी १० वाजल्या पासुन ६ वाजेपर्यंत विविध भजनी मंडळाचे भजन संपन्न झाले. यात गोपाळ जोशी, प्रा. जामखंडे, उध्दव महाराज हैबतपुरे, यांच्या व इतर भजनी मंडळांनी भजन गायन करुन सेवा केली.

उदागिरी बाबाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी शेटकार गल्ली येथे गणेश मंडळाच्या वतीने अल्पोहाराची व्यवस्था करण्यात आली यावेळी मलकापुरचे ग्रा.प. सदस्य महेश तोडकर, अजय शेटकार, तम्मा शेटकार, उपस्थित होते. तर नकाशे परिवाराच्या वतीने व किल्ला गल्ली युवक मंडळाच्या वतीने जलपानाची व्यवस्था केली होती. भाविक भक्तांना योग वेदांत सेवा समितीच्या वतीने शरबत ची व्यवस्था केली होती. यावेळी सेवानिवृत्त अभियंता सामेश्वर हुडे यांच्यासह सेवा समितीचे सदस्य उपस्थित होते. विजय चिखले यांच्या उदयकुमार क्लिनीक लॅबोरेटरीच्या वतीने भाविक भक्तांचे शुगर, बी.पी., रक्त तपासणी मोफत करण्यात आली. उदागिरी बाबाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मुख्य कमानीपर्यंत रांगा लावण्यात आल्या होत्या.

किल्ला परिसरात विविध स्टॉलने परिसर गजबजून गेला होता. भाविक भक्तांना दर्शन घेता यावे म्हणून उदगीर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक करण सोनकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली चौबारा, किल्ला, मंदिर परिसरात चोख बंदोबस्त ठेवला होता. उदागिर बाबा महोत्सव पार पाडण्यासाठी प्रारंभसेवेसाठी अर्जून जाधव, सचीन जाधव, नागेश गिरी,अतुल गिरी,सोनू महाराज,सुभाष मंकावार,दत्तापूरी अमोल लोहकरे, संदिप उप्परबावडे, संगम खंदारे, संतोष रावणकोळे, राहूल चौधरी, रामकिशन नागरगोजे, श्रीहरी नागरगोजे, मारोती नागरगोजे, विकास मुंडे, सतिष पुरी, साई गुडमलवार, रमेश शेटकार,हावगी कांजे,अमित गिरी, अमित बावगे, गजानन मुक्कावार इत्यादींनी परिश्रम घेतले.

# क्रांती माध्यमिक विद्यालयाने काढली मतदार जनजागृती प्रभात फेरी



**जळकोट (प्रतिनिधी)** तालुक्यातील कांती माध्यमिक विद्यालय ही शाळा उपक्रमशिल संस्था म्हणून पंचक्रोशित प्रसिद्ध आहे . केंद्र व राज्य शासनाच्या आदेशान्वये लातूर जिल्हा अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी, लातूर व लातूर जिल्हा शिक्षण विभागाच्या वतीने लोकसभा निवडणुकीच्या पाश्वभूमीवर भारतीय या लोकशाहीच्या महाउत्सवात सर्व नव मतदारांना , तसेच महिलां नाही सहभागी होता यावे , त्यांनी आपले बहुमोल मतदान करून राष्ट्रीय कर्तव्य बजावावे यासाठी गावातील मुख्य रस्त्याने मतदार जनजागृती फफेरी काढली गेली . शाळेतील सर्व मुलां - मुलींनी शाळेच्या गणवेशात शाळेपासून ते गावातील मुख्य रस्त्याने हातात ध्वज , फफलक , बॅनर आणि बॅड संचलन करीत , घोषणा देत जनजागृती फफेरी काढली . या येळी जमलेल्या नव मतदारांना शाळेचे मुख्याध्यापक मा . श्री . विलास सिंदगीकर यांनी मार्गदर्शन करून पत्रकाचे वाचन केले . मतदानाचे महत्व पटवून देण्यासाठी मुलांना आईवडिलांना पत्र लिहिण्याचा कार्यकम राबविण्यात आला व शपथपत्र वाचून शपथ देण्यात आली . या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याधापक विलास सिंदगीकर , शाळेचे सांस्कृतिक प्रमुख के.जी.गोंड पाटील , ए .जी . सिंदगीकर , ए .जी .काळे देवीदास मरशिवणे, जे.जी. दळवे रमेश केंद्रे आणि केशव दळवे या कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेऊन कार्यकम यशस्वीरित्या पार पाडला . यावेळी गावातील मतदार बंधू , नागरीक , शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उदगीरच्या भाऊसाहेब सहकारी बँकेस १ कोटी १५ लक्ष निव्वळ नफा व ०.४६ टक्के नेट एनपीए

**उदगीर (प्रतिनिधी)** बँकींग क्षेत्रात उत्तमप्रकारे, दर्जेदार सेवा देणाऱ्या भाऊसाहेब सहकारी अर्बन बँक, लि. उदगीर यास मार्च २०२४ पर्यंत १ कोटी १५ लक्ष निव्वळ नफ्फा व ०.४६ टक्के नेट एनपीए झाला असल्याची माहिती बँकेचे चेअरमन भगवानराव पाटील तळेगावकर व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी दिली. बँकेचे एकूण ठेवी ८८ कोटी व कर्जे ५८ कोटी असल्याचेही तळेगावकर यांनी यावेळी सांगितले. २०२३-२४ मध्ये



बँकेला भारतीय रिझर्व्ह बँकेने भाऊसाहेब बँकेची आर्थिक परिस्थिती उत्तम असल्याने लातूर व तुळजापूर शाखेस मंजुरी दिली व ते शाखा सध्या उत्तम कार्यरत आहेत. मागील काळात रिझर्व्ह बँकेने मोबाईल बँकिंग ही सेवा चालू करण्यास परवानगी दिल्यामुळे त्याद्वारे बँक आपल्या ग्राहकास उत्तम सेवा देत आहे. पुढील काळात बँक नांदेड, देगलूर व अहमदूर येथे शाखा काढणार असून, बँकेचे ठेवी २०० कोटी करण्याचाही निर्धार यावेळी तळेगावकर यांनी व्यक्त केला. भारतीय रिझर्व्ह बँकेचे मार्गदर्शन, सुचना व सहकार विभागाच्या सर्व नियमांचे पालन करून भाऊसाहेब सहकारी बँकेने अतिशय प्रेरणादायी वाटचाल करीत असून या वर्षात बँकेस मिळालेल्या यशाचा आपणास अतिशय आनंद होत आहे. बँकेच्या या यशस्वी वाटचालीत बँकेचे संचालक, सभासद, ग्राहक, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत कुलकर्णी, बँकेचे कमचारी, बँकेचे सर्व खातेदार व हितचिंतक या सर्वांचा सहभाग असल्याचे बँकेचे चेअरमन भगवानराव पाटील तळेगावकर यांनी यावेळी सांगितले.

# जळकोट शहर व तालुक्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस

**जळकोट (माधव होनराव)** जळकोट शहरासह तालुक्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस होऊन आंबा व ज्वारीचे प्रचंड नुकसान झाले. शहरालगतच्या शेतातील आंब्याच्या झाडावर वीज पडून झाड जळाले व शेतकऱ्याला धाप लागली मात्र जिवित हानी टळली असून विद्युत पुरवठा दोन तास खंडित झाला. तसेच अनेकांच्या घर व गोठयावरची पत्रे उडाली.

जळकोट शहरासह तालुक्यातील आतनूर , गव्हाण, चिंचोली, गुत्ती, डोंगरगाव, सुल्लाळी, मरसांगवी, हळद वाढवणा, शिवाजीनगर तसेच वांजरवाडा परिसरात सायंकाळी पाचच्या सुमारास प्रचंड वाऱ्याचा व विजेच्या गडगडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. दोन तास मोठ्या प्रमाणात चक्रीवादळा सारखे वादळ येऊन घर व गोठयावरची पत्रे वाऱ्याने उडून गेली. आंब्याचे मोठे प्रमाणात नुकसान झाले आहे. भाजीपाला लागवड असलेल्या कांदा, मिरची, भुईमुंग, गहू, भाजीपाला पिकासह, केशर आंबा, भुईमुंग शेंग, उन्हाळी लागवड कांदा, टमाटे, दोडका, गाय, वासरू गोटा, कांदा चाळ इतर पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे सांगितले. दोन तास झालेल्या वादळी वाऱ्यामुळे जळकोट शहरातील प्रकाश कारभारी यांच्या अंब्याच्या झाडावर वीज पडून आग लागली. या अवकाळी पावसामुळे जळकोट शहरासह तालुक्यातील गाव, वाडी, तांडा वस्तीतील लाईट अचानकच खंडित होऊन वीज पुरवठा बंद होता. या नुकसानीचे त्वरित महसूल विभाग, कृषी विभागाकडून पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.